# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## सर्व साधारण सभा

मंगळवार दि. ०५.१.२०१६ रोजी दुपारी ३.०० वा. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. शैलजा किशोर स्वामी, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| कुरेशी शफि अहेमद | कदम गंगाबाई नारायणराव |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | सातोलीकर श्रीनिवास आशन्ना |
| पवळे उमेश देवराव | कोकाटे नागाबाई भूजंगराव |
| कंठेवाड सविता मारोतराव | चव्हाण आनंद शंकरराव |
| मुंढे शांता मोतीराम | आनेवार गंगासागर संदिप |
| कल्याणकर बालाजी देविदासराव | भवरे किशोर दामोधर |
| कदम शीला सुनिल | खेडकर प्रमोद मुरलीधरराव |
| कनकदंडें मोहिनी महेशराव | स.जानी म.कासीम |
| मोकले सोनाबाई रामचंद्र | जाधव जयश्री आनंद |
| गुर्रम विनयकुमार जगदिश | चव्हाण श्रध्दा सुशिल |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | उमरेकर अशोक रावण |
| रजियाबेगम अयुबखान | सलिमा बेगम नुरुल्लाखान |
| गाडगे शंकर जयवंतराव | देशमूख वैशाली मिलिंद |
| गायकवाड अंजली सुरेशराव | देशमूख बाळासाहेब गंगाधरराव |
| गफारखान गुलाम महमंद खान | धबाळे गणपत गुणाजी |
| अनुजा अमितसिंह तेहरा | राओत्रे संगिता पृथ्वीराज |
| गील सरजितसिघ पंजाबसिंघ | अ.हबीब अ.रहिम बागवान |
| अ.फसीया फिरदोस | अ.सत्तार अ.गफुर |
| स.शेर अली स.महेबुब अली | कुरेशी चॉंदपाशा खाजा |
| फारुख हुसेन कासिम साब | राखेवार सतिष शेषप्पा |
| चाऊस हसिना बेगम साबेर | अ.लतिफ अ.मजिद |
| जकिया बेगम स.मुखतार | गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल |
| खोमणे सुदर्शना महेश | बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला |
| लतिफा बेगम बु-हाणखान | रावत दिपकसिंह काशिनाथसिंह |
| किशोर किशनलाल यादव | गायकवाड वैजयंती भिमराव |
| मोरे संजय गंगाधरराव | अभिषेक सौदे |
| काकडे सिंधू पांडूरंग | चिखलीकर संदिप सुभाषराव |
| प्रा.ललिता मुकूंदराव बोकारे | विनय विश्वांभरराव पाटील |
| जमदाडे करुणा भिमराव | घोगरे इंदूबाई शिवाजी |
| येवनकर विजय हिरांचद | कदम विश्वास बालाजी |
| अड.बन शाम वामनराव | काबरा रामनारायण रामदेव |
| अल केसरी हसन बिन उबेद | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर सौ.शैलजा किशोर स्वामी, या होत्या. तसेच श्री सुशील खोडवेकर, आयुक्त, श्री रमेश नानकराम होतवानी, अधिक्षक अभियंता, भारत स्वच्छता अभियांन, श्री प्रकाश येवले, उपआयुक्त, श्री आर.एस.कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, डॉ.असिफ, प्रभारी मुख्य वैद्याकिय आरोग्याधिकारी, श्री महमंद सादिक, मुख्य लेखाधिकारी, श्री विजय मुंढे, स.आयुक्त आरोग्य,श्री गिरीष कदम, का.अभियंता सा.बा.वि. डॉ.श्री रईसोध्दीन, पशु वैद्यकिय अधिकारी, श्री खुशाल कदम, नगररचनाकार, व महानगरपालिकेचे सर्व सहायक आयुक्त/क्षेत्रिय अधिकारी व इतर सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले.

**महापौर** — उपस्थित सर्व स. सदस्य,आयुक्त,अधिकारी कर्मचारी याचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामाकाजास सुरुवात करण्यात येते.

**रामनारायणजी काबरा** — पंजाब राज्यातील पठाणकोट येथे दहशतवाद्यानी केलेल्या हल्यात राष्ट्रीय सिमा सुरक्षा दलाचे ६ जवानासह एक लेफटनंन कमांडर शहीद झाले त्यांना भावपुर्ण,श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** — श्री रामनारायणजी काबरा यांनी मांडलेल्या प्रस्तावा प्रमाणे पठाणकोटमध्ये दहशतवाद्यानी केलेल्या हल्यात मृत पावलेल्या शहिद जवानाना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**दिपकसिंह रावत** — याप्रस्तावास संपुर्ण सभागृहाचे अनुमोदन आहे.

**अ.हबीब बागवान** — माझ्या प्रभागात देगलूर नाका भागात डेनेज लाईनचे काम करीत असतांना चेंबरमध्ये पडून मुखीदखान खुर्शीदखान या मजुराचा मृत्यू झाला त्यासही श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**रजिया बेगम** — याप्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** — पठानकोट येथे शहिद झालेल्या जवानाना तसेच देगलूर नाका येथे झालेल्या दूर्घटनेत मृत पावलेल्या मजुरास भावपूर्ण श्रदांजली अर्पण करण्यात येते.

**ठराव क्र.९७** **ठराव**

पंजाब राज्यातील पठानकोट येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्यात राष्ट्रीय सिमा सुरक्षा दलाचे ६ जवानासह एक लेफटनट कर्नल शहीद झाले त्यांना ही नांवामनपा सभा सर्वानुमते भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. व त्यांचे कुटुंबियावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

तसेच देगलूर नाका येथे मलनिस्सारण लाईनचे काम करीत असतांना चेंबरमध्ये पडून मुखीद खान खुर्शीद खान या मजुराचा मृत्यू झाला त्यांना ही नांवामनपा सभा सर्वानुमते भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. व त्यांचे कुटुंबियावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

**महापौर** — नांवामनपाकेतील एमआयुएम–संविधान युतीचे गटनेते श्री स. शेर अली यांनी आपल्या गटनेते पदाचा राजीनामा दिल्यामूळे एमआयुएम–संविधान युतीचे गटनेते म्हणून बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला यांना मान्यता देण्यात आलेली आहे.एमआयएमचे गटनेते असतांनाश्री स.शेरअली यांनी शहर विकासाचे कामात चांगल्या प्रकाचे सहकार्य केलेले आहे त्याबध्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येते त्याच प्रमाणे बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला हे ही सहकार्य करतील अशी मी त्यांचेकडून अपेक्षा व्यक्त करते.

**विरेंद्रसिंध गाडीवाले** — एमआयुएम – संविधान युतीचे गटनेते म्हणून श्री बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला याची निवड झालेली असल्यामूळे त्यांचे मी अभिनंदन करतो..श्री स .शेर अली यांची कारकीर्द चांगली राहिलेली असल्यामूळे त्यांचे ही मी अभिनंदन करतो.

**अ.सत्तार** — श्री स. शेर अली हे गटनेते असतांना त्यांनी शहर विकास कामासाठी अत्यंत चांगले मार्गदर्शन केलेले आहे त्याबध्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येते व तसेच त्यांनी राजीनामा दिल्यामूळे श्री बावजीर शेख हबीब यांना गटनेते म्हणून मान्यता देण्यात आली त्यांचेही अभिनंदन करण्यात येते. तसेच महापौर, आयुक्त, सभापती, स्थायी समिती यांना नविन वर्षाच्या हार्दीक शूभेच्छा देतो त्यांनी या वर्षात शहरात चांगली विकासाची कामे करावे अशी मी त्यांचेकडेन अपेक्षा व्यक्त करतो.

**सरजितसिंघ गिल** — श्री स.शेर अली हे एमआयुएम–संविधान युतीचे गटनेते म्हणून कार्यरत असतांना त्यांनी अत्यंत उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.शहर विकास कामांच्या संदर्भात खुप चांगले प्रस्ताव दिलेले आहे व सर्वसाधारण सभेसही चांगले मार्गदर्शन केलेले आहे त्याबदल त्यांचे अभिनंदन करण्यात यावे व नविन गटनेते श्री बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला यांचेही अभिनंदन करण्यात यावे.

**महापौर** — श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी मांडलेल्या प्रस्तावा प्रमाणे श्री स.शेर अली व श्री बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला याचे अभिनंदन करण्यात येते.

**ठराव क्र.९८** **ठराव**

श्री स.शेर अली महेबुब अली हे एमआयुएम–संविधान युतीचे गटनेते असतांना त्यांनी शहर विकास कामासाठी खुप चांगले मार्गदर्शन करुन महानगरपालिकेस सहकार्य केले त्याबध्दल त्यांचे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा अभिनंदन करते तसेच श्री स.शेर अली यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामूळे एमआयुएम–संविधान युतीचे गटनेते म्हणून श्री बावजीर शेख हबीब शेख यांना मान्यता देण्यात आली त्यांचेही अभिनदन ही नांवामनपा सर्वसाधारण सभा अभिनंदन करते.व त्यांकडूनही शहर विकास कामासाठी चांगल्या प्रकारचे सहकार्य मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करते.

**विश्वास कदम** — नांदेड महानगरपालिकेतमार्फत शहरात राजर्षी छत्रपती शाहु महाराज, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक, जगज्योती महात्मा बसवेश्वर, महात्मा फुले, सावित्रीबाई यांचे पुर्णाकृती पुतळे बसविण्याची सर्वाची मनापासून इच्छा आहे परंतु शहरातील सर्व सामान्य नागरीकामध्ये थोर महापुरुषांचे पुतळे बसविण्यासाठी महापौर, आयुक्त व सभागृह काहीच प्रयत्न करीत नाहीत, आयुक्त,महापौर, सदस्य हे महापुरुषांची पुतळे बसविण्याच्या विरोधात आहेत अशी चर्चा होत आहे, आयुक्त साहेबांना विनंती आहे की, महापुरुषांचे पुतळे बसविण्यासाठी महानगरपालिकेने आज पर्यत काय कार्यवाही केली आहे, महापौर व आयुक्तांना काय अधिकार आहेत याचा खुलासा करण्यात यावा.

**अभिषेक सौदे** — नविन कौठा भागात जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा बसविण्याच्या संदर्भात दररोज वृत्तपत्रात उलट सुलट बातम्या प्रसिध्द होत असून यामूळे महागनपालिकेची बदनामी होत आहे.या सभागृहाने दि.२४.१२.२०१२ रोजी ठराव क्र.१२५ अन्वये एकमताने महात्मा बसवेश्वराचा पुतळा उभारण्याच्या निर्णय घेतलेला आहे. महात्मा बसवेश्वराचा पुतळा बसविण्यासाठी शासनाच्या कोण कोणत्या मंजु-या घेणे बाकी आहे.पुतळयाकरीता जागा संपादन करण्याची कार्यवाही कुठपर्यत आली,हा पुतळा किती दिवसात बसविण्यात येणार आहे यांचा खुलासा करण्यात यावा.पुतळा माझ्या प्रभागात बसविण्यात येणार असून या समाजाचे नागरीक मला पुतळा किती दिवसात बसविण्यात येणार अशी वारंवार विचारणा करीत आहे. हा पुतळा किती दिवसात बसविण्यात येणार आहे याचे आश्वासन देण्यात यावे जेणे करुन नांदेड शहरवासीयांचा भ्रम दुर होईल.

**अशोक उमरेकर** महानगरपालिकेच्या समोर जगतज्योती महात्मा बसवेश्वराचा पुतळा बसविण्यासाठी नागरीक घंटानाद व शंखनाद करुन धरणे आंदोलन करीत आहेत, महापौर मॅडम या त्या समाजाच्या असूनही महात्मा बसवेश्वरांचा पुतळा बसविण्यासाठी त्या प्रयत्न करीत नाहीत अशी तिवृ भावना नागरीकांच्या मनात निर्माण झालेली आहे व ते महापौरांच्या विरोधात भुमिका घेवून घोषणाबाजी करीत आहेत.महापौर मॅडम यांना विनंती आहे की,उद्याच त्या समाजातील नागीकांची एक बैठक घ्यावी व निश्चित करण्यात आलेल्या जागेच्या ठिकाणी वायर फेन्सीग करुन नियोजित जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचा पुतळयाची जागा असा बोर्ड लावण्यात यावा व नागरीकांना शांत करावे. भविष्यात जेव्हा शासनाची मान्यता प्राप्त होईल त्यावेळी त्या ठिकाणी पुतळा बसविण्यात यावा.जेणे करुन नागरीकांचे मनात जो संभ्रम निर्माण झालेला आहे तो दुर होवून आपणा विरुध्द रोष राहणार नाही.

**किशोर यादव** परवा शिवाजीनगर भागातील सहयोग कॅटरर्सला मोठी आग लागली होती महानगरपालिकेच्या अग्नीशमन विभागातील अग्ननीशमन अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचा-यानी जीवावर उदार होवून दोन तीन तासात आग आटोक्यात आणली, त्याबंदल त्यांचे अभिनंदन करण्यात येते,यावेळी मा.आ.श्री डि.पी.सावंत, महानगरपालिकेचे माजी सभापती,श्री किशोर स्वामी, श्री अमितसिंह तेहरा, हे घटनेचे वेळी आले होते .घटनास्थळाच्या आसपास पाण्याची व्यवस्था नसल्यामूळे आग लवकर आटोक्यात आणता आली नाही.भविष्यात शहरात कुठेही आगली तर पाण्याची व्यवस्था कशी करता येईल याचा विचार करण्यात यावा.

**श्रध्दा चव्हाण** सर्व प्रथम मी व माझ्या कुटुंयातर्फे मा.महापौर,मा.आयुक्त, सर्व स.सदस्य अधिकारी कर्मचा-याना नविन वर्षाच्या हार्दीक शूभेच्छा देते.महापौर पदाची निवडणूक झाल्यानंतर आम्ही सर्व महिला सदस्यांनी महापौर मॅडमकडे महिला सदस्यांना सभेच्या सुरवातीस अर्धा तास बोलण्याची संधी द्यावी अशी मागणी केली होती. महिला महापौर असतांनाही महापौर मॅडम महिलांना बोलण्याची संधी न देता महिलाना खाली बसण्यास सांगत आहेत,वास्तविक पाहता महिला सदस्य बोलत असतांना पुरुष सदस्यांनी खाली बसावयास पाहिजे व त्यांचे बोलणे झाल्यानंतर बोलण्यास उभे रहावयास पाहिजे परतु असे होत नाही. महिलांना सुरवातीस अर्धातास बोलण्याची संधी देण्यात यावी.

**महापौर** महिला सदस्या अर्धा तास कशा करीता मागीत आहे पुर्ण वेळ बोलावे आपणास इतर सदस्यांचे बरोबरीने बोलण्याचे अधिकार आहेत. किशोर यादव अगोदर बोलण्यास उभे राहून सुचना करीत होते त्यामूळे त्यांचे बोलणे होवून द्यावे आपण त्याचे बोलणे झाल्यानंतर बोलावे असे सांगितले होते,

**श्रध्दा चव्हाण** महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा बसविण्यासाठी त्यांचे समाजाचे नागरीक आंदोलन करीत आहेत. आमच्याही समाजाने आमचे नेते कृषीतज्ञ व राज्याचे माजी मुख्यमंत्री कै.वसंतरावजी नाईक यांचा पुतळा बसविण्यासाठी आंदोलन केले होते. कै.वसंतरावजी नाईक यांचा पुतळा बसविण्यासाठी देण्यात आलेल्या प्रस्तावास मी अनुमोदन दिले होते.मागील तीन वर्षापासून कै.वसंतरावजी नाईक यांचा पुतळा बसविण्याकरीता प्रशासनाकडे पाठपुरावा करीत आहे व त्याअनुषंगाने एक उपसमिती कायम करण्यात यावी असाही प्रस्ताव दिला होता परंतु अगोदर पासून उपसमिती कायम करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. माझी इच्छा आहे की, २५ वर्षापासून विमान तळ रोड वरील टि पॉईटवर कै.वसंतराव नाईक यांच्या नियोजित पुतळयाची जागा अशा प्रकारचा फलक लावण्यात आलेला आहे.त्या फलकास महानगरपालिकेने अधिकृत करावे किंवा त्या ठिकाणी महानगरपालिकेने नियोजित कै.वसंतराव नाईक यांच्या पुतळयाची नियोजित जागा असा फलक लावण्यात यावा व त्यांचा सन्मान करावा एवढीच माझी विनंती आहे.

**शीलाताई कदम** शहरात महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा बसविलाच पाहिजे त्यामध्ये कोणाचेही दुमत नाही.याशिवाय इतरही महापुरुषांचे पुतळे उभारण्यासाठी सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे जसे आदरणीय डॉ.शंकररावजी चव्हाण, पदमश्री शामरावजी कदम, स्वातंत्र सैनिक साहेबरावजी बारडकर,व्यंकटराव तरोडेकर यांचे पुतळे का बसविण्यात आलेले नाही. ते बसविण्यासाठी प्रशासनाने काय कार्यवाही केली याची माहिती देण्यात यावी.

**महापौर** महात्मा बसवेश्वर पुतळा व इतर महापुरुषांचे पुतळे बसविण्याच्या संदर्भात आज पर्यत काय कार्यवाही केली याची माहिती सभागृहास द्यावी.

**सरजितसिंघ गिल** स.महापौर, उपमहापौर ,लोकप्रिय आयुक्त श्री सुशिल खोडवेकरजी इंग्रजी नविन वर्ष सुरु होण्यापुर्वी ३१ डिसेंबर रोजी आयुक्त साहेबांचा वाढदिवस न भूतो न भविष्यती असा वाढदिवस महानगरपालिकेच्या वतीने साजरा करण्यात आला त्याबध्दल मी सर्वाना धन्यवाद देतो. श्री सुशिलजी खोडवेकर साहेब आयुक्त पदाचा पदभार घेण्यासाठी जेव्हा नांदेडला आले होते, त्यांनी प्रथम गुरुव्दारात जावून माथा टेकला होता, तेव्हा गुरुव्दाराचे जत्थेदार यांनी अर्धा बसून त्यांना अमृत प्रसाद देवून सत्कार केला होता त्यावेळी तेथे उपस्थित असलेले गुरुव्दारा बोर्डाचे अध्यक्ष व आमचे लाडके आमदार तारासिंघजी यांनीही श्री खोडवेकर साहेबांचा सत्कार केला होता.गुरुव्दारा मार्फत अशांचा सत्कार करण्यात येतो जे गुरुग्रंथ साहीबाकरीता काही करते.श्री खोडवेकर साहेबांनी आयुक्त पदाचा पदभार घेतल्यानंतर त्यांना मी ,श्री अ.सत्तार व श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांचे सह भेटून गुरुव्दारा परिसरात व गुरुव्दारा लंगर

साहिब करीता पाण्याची मोठी समस्या आहे ती दुर करण्यात यावी अशी मागणी केली होती तेव्हा त्यांनी गुरुव्दारा यात्रेकरुना पाणी मिळत नसेल तर महानगरपालिकेचा आमचा काहीच उपयोग नाही असे सांगून ही दोन्ही कामे तात्काळ सुरु करण्यात येतील, असे आश्वासन आम्हाला दिले होते.यावेळी दक्षिण नांदेडचे आमदार श्री हेंमत पाटील,उत्तर नांदेडचे आमदार श्री डि.पी.सावंत ही उपस्थित होते.आज गुरुव्दारा परिसरात पाणी पुरवठा लाईनचे काम सुरु झालेले आहे त्याबध्दल मी आयुक्त साहेबाचे अभिनंदन करतो. गुरुव्दारा लंगर साहिब करीता पाणी पुरवठा पाईप लाईन टाकण्याचे कामही लवकरच ते सुरु करतील याबध्दल शंका नाही, त्यांचा वाढदिवस न भूतो न भविष्यती अशा प्रकारचा साजरा करण्यात आला असाच वाढदिवस दरवर्षी साजरा व्हावा उत्तरोत्तर त्यांची प्रगती होवो असेच आम्ही आपले अभिनंदन करीत राहु .आयुक्त साहेबाना विंनती आहे की,गुरु ता गध्दी कार्यक्रमा अंतर्गत जी कामे राहिलेली आहे ती पुर्ण करावी, अबचलनगर भागात १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून मलनिस्सारण लाईन टाकण्यास मान्यता देण्यात आलेली आहे ते कामही आपण लवकर सुरु करावे अशी मी आपणाकडून अपेक्षा व्यक्त करतो धन्यवाद

**अ.सत्तार** आयुक्त साहेबांनी गुरुव्दारा परिसरातील पाण्याचा प्रश्न सोडविला त्याबदल त्यांचे अभिनंदन करण्यात येते.श्री विश्वास कदम यांनी महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा बसविण्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे.नांदेड शहरात महात्मा बसवेश्वराचा पुतळा बसविण्याचा निर्णय याच सभागृहाने घेतलेला असून हा पुतळा बसविणेसाठी महानगरपालिका सतत प्रयत्नशील आहे. परंतु त्या समाजाचे काही लोक नागरीकांमध्ये महात्मा बसवेश्वरांचा पुतळा बसविण्याच्या संदर्भात महापौर, महानगरपालिका काहीच प्रयत्न करीत नाही, अशा प्रकारचा गैरसमज करीत आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने अनेक महापुरुषांचे पुतळे बसविलेले आहे. महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविण्याकरीता रु.३.०० कोटीचा खर्च नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेले केलेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, रविंद्रनाथ टागोर यांचे पुतळयाचे सुशोभिकरणही महागनरपालिकेनेच केलेले आहे. पंरतु शहरातील काही नेते महात्मा बसवेश्वराचे पुतळयाचे श्रेय घेण्यासाठी आंदोलने करीत आहेत.त्यांना आंदोलन करुन द्यावे त्यांच्या आदोलनाकडे लक्ष देण्यात येवू नये. महानगरपालिका महात्मा बसवेश्वराचा पुतळा बसविण्यासाठी कटीबध्द आहे. त्यादृष्टीने आमचे महापौर व आयुक्त प्रयत्नशिल आहे. आयुक्त साहेबांनी महापुरुषांचे पुतळे बसविण्याच्या संदर्भात आज पर्यंत काय कार्यवाही केली याची माहिती सभागृहास देण्यात यावी. काल देगलूर नाका भागात केसीपी कंपनीमार्फत चालू असलेल्या मलनिस्सारण लाईनचे काम करीत असतांना एक मजुराचा मृत्यू झाला यापुर्वीही जून्या नांदेड मध्ये नालीचे बांधकाम चालू असतांना दोन व्यक्तीचा मृत्यू झालेला आहे अशा घटना का वारंवार का घडत आहेत याचा विचार करण्यात यावा. सबंधित कंत्राटदारास तंबी देण्यात यावी. महानगरपालिका सबंधित कंत्राटदारास काम करण्याचे पैसे देते परंतु अशा घटनेमूळे महानगरपालिकेची बदनामी होत आहे. कंत्राटदारास त्याची कमी दराची निविदा असल्यामूळे त्याची निविदा मंजुर करुन त्यास कामाचे आदेश देण्यात येतात परंतु संबंधित कंत्राटदार आपले काम दुस-या कंत्राटदारास सबलेट करतात असे निविदेतील अटी व शर्तीनुसार करता येते काय हे नियमात बसते काय, सबधित कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामूळे मजुरांचा मृत्यू होत असेल तर त्यास सबंधित कंत्राटदार जबाबदार आहे, त्याचा महानगरपालिकेचा काहीही सबंध नाही. यापुर्वी जे झाले ते झाले परंतु भविष्यात आयुक्त साहेबांकडून अशा प्रकारच्या चुका होवू नये. आयुक्तांची ही पहिली महागनरपालिका आहे आपणास आणखी उच्च पदावर जावयाचे आहे, आपणास शिकायचे असेल तर आपण चांगली कामे करावीत.काल जी घटना घडली त्यावेळी वातावरण खुप तंग झाले होते. स.सदस्य श्री शेर अली यांनी त्याभागातील नागरीकांचे उद्रेंकाला सावरले वातावरण शांत केले.परंतु सबंधित कंत्राटदार महानगरपालिकेच्या विरोधी उलटसुलट बोलत आहे.

**विनय गुर्रम** संबंधित कंत्राटदारास तंबी देवून चालणार नाही त्याला ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्यात यावे. मुळ कंत्राटदारास निविदेतील अटी व शर्तीनुसार सबलेट करता येते काय याचा खुलासा करण्यात यावा.

**रजिया बेगम** ज्या मजुरांचा मृत्यू झालेला आहे तो माझ्या प्रभागातील असून त्यांच्या आई वडीलांची कौटुंबिक परिस्थिती अत्यंत खराब आहे त्यांच्या कुंटबियांना न्याय देण्यात याव आर्थिक मदत देण्यात यावी.

**दिपकसिंह रावत** ज्या कंत्राटदारानी अधिका-यांनी चांगली कामे केले त्यांचा महानगरपालिकेने गौरव केलेला आहे. काल देगलूर नाका भागात केसीपी कंपनीकडून ड्रेनेजचे काम चालू असतांना मजुराचा मृत्यू झालेला आहे यापुर्वीही नालीचे काम चालू असतांना दोन व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. असे असंतांना संबंधित कंत्राटदारा विरुध्द कार्यवाही का करण्यात येत नाही. या कंत्राटदाराच्या पाठीमागे कोण आहे . कंत्राटदारास काम देण्यात आल्यानंतर ते काम दुस-या कंत्राटदारास सबलेट करता येते काय सबलेट करावयाचे असेल तर त्यास स्थायी समिती सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागते अशा प्रकारची

मान्यता घेण्यात आलेली आहे काय माझा स्पष्ट आरोप आहे की, या कामाच्या कंत्राट मध्ये आपल्या अधिका-यांची पार्टनरशिप आहे.व ते या कंत्राटमध्ये गुंतलेले आहे.वास्तविक पाहता निविदेतील अटी व शर्तीनुसार ज्या ठिकाणी काम चालू असते तेथे नागरीकांच्या मजुरांच्या सुरक्षीततेसाठी कंत्राटदाराने आवश्यक ती व्यवस्था केली पाहिजे सावधानतेचा सुचना फलक लावावयास पाहिजे.

**अ.सत्तार** महानगरपालिकेचे अधिकारी पार्टनरशिपमध्ये कंत्राट घेत असतील त्यांना जेलमध्ये टाकण्यात यावे.

**दिपकसिंह रावत** मलनिस्सारणाचे काम सबलेट करण्यात आलेले आहे काय सबलेट केलेले असेल तर संबंधित कंत्राटदारा विरुध्द व जे अभियंते हे काम पाहत आहेत त्याचे विरुध्द ४२० चा गुन्हा दाखल करण्यात यावा. निविदातील अटी व शर्ती नुसार सबलेट करता येते काय सबलेट केले असेल तरते कोणाच्या मान्यतेने करण्यात आले याचा खुलासा करण्यात यावा.यामध्ये महानगरपालिकेचे अधिकारी गुंतलेले आहेत. भविष्यात अशा प्रकाच्या घटना घडणार नाही याची आयुक्त साहेबांनी दक्षता घ्यावी.

**विनय गुर्रम** संबंधित कंत्राटदाराने काहीही केले तरी त्यांचे विरुध्द कार्यवाही होत नाही म्हणून त्यांची हिम्मत वाढलेली आहे.जेव्हा मलनिस्सारणाचे काम चालू होते त्यावेळी महानगरपालिकेचा एकही अभियंता स्थळावर उपस्थित नव्हता.निविदा प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर व संबंधित कंत्राटदारास कामाचे आदेश दिल्यानंतर ते काम दुस-या कंत्राटदारास देता येत नाही असे असताना सबलेट कसे काय करण्यात आले याचा खुलासा करण्यात यावा.

**अशोक उमरेकर** चेंबरमध्ये अडकलेल्या मजुरास काढण्यासाठी गेलेले अग्नीशमन विभागाचे कर्मचारी जीवावर खेळत आहे. नियमानुसार संबधित कंत्राटदाराने मजुरांच्या सुरक्षेसाठी मजुरांना ऑक्सीजन मास्क व आवश्यक ते साहित्य यावयायस पाहिजे ही त्याची जबाबदारी होती,मजुरांच्या मृत्यूस कोण जबाबदार आहे

**प्रमोद खेडकर** नियमात सबलेट करण्याची तरतूद नाही, याकामाची मुळ एजन्सी कुठे गेली. कंत्राटदार महानगरपालिकेचे मालक होवून बसलेले आहे,दादागिरी करीत आहे. फाईलमध्ये एका कंत्राटदाराचे कागदपत्रे व प्रत्यक्षात काम करीत असलेला दुसरा कंत्राटदार ही कुठली पध्दती आहे. असे करता येते काय, महानगरपालिकेत अशा प्रकारची अनेक कामे करण्यात येते असतील तर निविदा मागविता कशाला, ते बंद करण्यात यावे.ज्या कत्रांटदारास कामाचे आदेश देण्यात आलेले आहे त्याच कंत्राटदाराकडून कामे करण्यात यावी. सबलेट केलेली सर्व कामे रध्द करण्यात यावी.व सबंधित कंत्राटदारास ब्लॅक लिस्ट मध्ये टाकण्यात यावे.

**शेख बावजीर** देगलूर नाका येथे चेंबरचे काम करीत असतांना एका मजुराचा मृत्यू झालेला आहे दोन वर्षापुर्वीही जून्या भागात नालीचे बांधकाम करीत असतांना दोन व्यक्तींचा मृत्यू झाला होता या पासून महानगरपालिकेने काय धडा घेतला आहे संबंधित कंत्राटदारास ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्यात यावे व त्यांना जास्तीत जास्त दंड आकारण्यात यावा. ज्या मजुराचां मृत्यू झालेला आहे त्यांच्या कुटुंबियास किती आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे, त्यांच्या कुटूंबियातील एका व्यक्तीस नौकरी देण्यात येणार आहे काय याचा खुलासा करण्यात यावा.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** काल देगलूर नाका येथे चेंबरचे काम करीत असतांना एका मजुरांचा मृत्यू झालेला आहे ही अत्यंत दूदैवी घटना आहे. भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नये याची काळजी आयुक्त साहेबांनी घ्यावी. जेव्हा ही घटना घडली त्यावेळी तेथे मोठा जनसमुदाय जमला होता ,परंतु त्या भागातील नगरसेवक श्री स.शेर अली व माजी महापौर श्री अ.सत्तार यांचे चिरंजीच श्री गफारखान यांनी त्या भागातील नागरीकांना व मृत मजुरांच्या कुटुंबियांना समजावून सांगून वातावरण शांत केले. कंत्राटदाराकडून आवश्यक ती आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले त्यामूळे मोठा अनर्थ टळला. श्री सं.शेर अली यांनी महानगरपालिकेचे सदस्य या नात्याने त्यांचे कर्तव्य निभावले आहे त्याबध्दल मी त्यांना धन्यवाद देतो. आयुक्त साहेबांनी गुरुव्दारा परिसरात नविन पाईप लाईन टाकून त्या पाण्याचा प्रश्न लवकर सोडविला जाईल असा शब्द दिला होता व तो शब्द त्यांनी पाळलेला आहे. आज गुरुव्दारा परिसरातून येत असतांना पाईप लाईन टाकण्याचे काम सुरु झाल्याचे दिसून आले. त्याबदल त्यांचे मी अभिनंदन करतो. लंगर साहिबला सुध्दा पाणी टंचाई आहे त्याकरीताही नविन डंकिन पासून ते लंगर साहीब पर्यत स्वतंत्र पाईप लाईन टाकून गुरुव्दारा लंगर साहिबचा पाण्याचा प्रश्न ही ते लवकर मार्गी लावतील अशी मी त्यांचेकडून अपेक्षा व्यक्त करतो.

आज सकाळ पासुन महानगरपालिका कार्यालयाच्या समोर महात्मा बसवेश्वरांचा पुतळा बसविण्यासाठी त्यांचे समाजाचे नागरीक आंदोलन करीत आहेत त्यांना महात्मा बसवेश्वरांचा पुतळा उभारण्यासाठी महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यासाठी माजी महापौर श्री अ.सत्तार यांचेसह आम्ही काही नगरसेवक, आदोलनाच्या ठिकाणी गेलो होतो, उपस्थित नागरीकांना महात्मा बसवेश्वराचा पुतळा लवकरा लवकर उभारण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल असून महानगरपालिकेस येत असलेल्या अडचणी दुर करण्यसाठी बसवेश्वर पुतळा कृती समाजानेही आम्हाला सहकार्य करावे, या मागणी करीता आम्हीही तुमच्या पाठीशी आहोत असे सांगितलेले आहे परंतु त्या ठिकाणी असे चित्र पहावयास मिळाले की नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका व महापौर महात्मा बसवेश्वराचां पुतळा बसविण्यासाठी काहीच प्रयत्न करीत नाहीत, अशा प्रकारची भावना त्यांच्या मनात निर्माण झालेली

आहे ,वास्तवित पाहता महापौर मॅडम यांनी तीन वर्षापुर्वी पुतळयाचा प्रस्ताव सभागृहात मांडला होता व त्यास सभागृहाने मान्यता दिली होती व तेव्हा पासुन महापौर मॅडम महात्मा बसवेश्वराचा पुतळा बसविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. खा.श्री अशोकरावजी चव्हाण साहेबांचे सुध्दा मार्गदर्शन घेत आहेत त्यांच्याही दोन अनौपचारीक बैठका घेतल्या.वारंवार आयुक्त,श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता, श्री बेग, उद्यान  अधिक्षक यांच्याकडे पाठपुरावा करीत आहे.याचा मी साक्षीदार आहे.परंतु पुतळा बसविण्यासाठी काही तात्रिक अडचणी येत आहे.  पुतळयासाठी श्री परशुराम जाधव  याची खाजगी  जागा निश्चित करण्यात आली परंतु ते जागा देण्यास तयार नाहीत त्यांना आयुक्त साहेबांनी वाटाघाटीसाठी दोन तीन वेळेस बोलावून चर्चा केली आहे. महापौर मॅडम मनापासुन महात्मा बसवेश्वराचा पुतळा बसविण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहेत त्याबदल मी त्यांचे  अभिनंदन करतो. लवकरात लवकर महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा व इतर महापुरुषांचे पुतळे बसविण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशिल आहे. आयुक्त साहेबाना विनंती आहे की. खाजगी जमिन मालक श्री परशुराम जाधव यांचेशी वाटाघाटी करुन जागा संपदित करावी तत्पूर्वी नियोजित  महात्मा बसवेश्वराचा पुतळयाची प्रतिमा महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयाकडून मान्य करुन घेण्यात यावी.महानगरपालिकेचे लक्ष वेधण्यासाठी महात्मा बसवेश्वर कृती समितीने आदोलन केले त्यात काही गैर नाही परंतु  कृती समितीने महानगरपालिकेच्याही अडचणी समजून घ्याव्यात, व महानगरपालिकेस या कामासाठी सहकार्य करावे. जमिनीचे मालक यांनाही पुतळयाकरीता जागा देण्यासाठी चर्चा करावी.महानगरपालिका  लवकरात लवकर पुतळा बसविण्यासाठी प्रयत्नशिल आहे.

**आयुक्त**

मला नविन वर्षाच्या हार्दीक शुभेच्छा दिल्या त्याच प्रमाणे माझ्याही आपणा सर्वाना नविन वर्षाच्या हार्दीक शूभेच्छा. स.सदस्यांनी महापुरुषांचे पुतळे बसविण्याचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. जिल्हयाचे खासदार आदरणीय श्री अशोकरावजी चव्हाण साहेबांनी सहा महिण्यापुर्वी अनौपचारीक बैठक घेतली होती त्यावेळी  शहरात पाच पुतळे बसविण्याच्या संदर्भात चर्चा झाली होती. आयटिआय जवळ महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा बसवून विस्तारिकरण करणे. या अर्धाकृती पुतळया जवळील ठिकाणची  त्रिकोणी जागा संपादित करावयाची असून ही जागा ज्यांच्या नांवावर आहेत ते प्रकरण सध्या  न्याय प्रविष्ट असून न्यायालयाच्या डिक्रिनंतर संबंधितांच्या नांवावर जागा झाल्यानंतर त्यांचेशी वाटाघाटी करुन जागेचा जो काही मावेजा होइल त्याप्रमाणे मावेजा देवून जागा हस्तांतरीत करता येईल, महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे संकल्पीत पुर्णाकृती पुतळा प्रतिमेची शासनाच्या कला संचालनायाकडून मान्यता घेवून पुतळे बसविता येतील.या पुतळयाचे जे शिल्पकार आहेत त्यांचेशी माझी दोन तीन वेळेस चर्चा ही झालेली आहे. अगोदरपासून तेथे अर्धाकृती पुतळे असल्यामूळे नव्याने शासनाची पुन्हा इनप्रीन्सीपल अप्रूव्हल घेण्याची आवश्यकता नाही. पावडेवाडी नाक्याजवळील परभणी कृषी विद्यापिठाच्या कृषी विद्यालयाच्या जागेत राजाश्री छत्रपती शाहु महाराज यांचा पुतळा बसविण्यासाठी परवानगी देण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता मला सभागृहास स्पष्ट सांगावयाचे आहे की, महाराष्ट शासनाने उच्च न्यायालयाचे १३ जानेवारी २०१३ निर्णयानुसार या पुतळयाची परवानगी नाकारलेली आहे.त्यानंतर खासदार श्री अशोकरावजी चव्हाण साहेबांनी सांगितले की राजर्षी शाहु महाराज यांच्या पुतळयाकरीताच कृषी विद्यापिठाची जागा घेतलेली असून तशा प्रकारचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे त्यामूळे याचा संदर्भ देवून पुनश्च प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर करण्यात यावा त्यानुसार तीन दिवसापुर्वीच नव्याने प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. या प्रस्तावास शासनाकडून मान्यता मिळेल अशी आशा आहे.या प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाल्यानंतर पुतळा बसविण्याची कार्यवाही करण्यात येईल. आयटिआय यशवंत कॉलेज समोरील जागेत भगवान बुध्दांची मुर्ती बसविण्यास सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. त्याकरीता निश्चित करण्यात आलेल्या  जागेचे पिआर कार्ड काढण्यात आले असता त्या जागेचे पिआर कार्ड महानगररपालिकेच्या नांवाने निघालेले आहे.उच्च न्यायालयाने केस क्र.८५१९/१९.२.२००६ दि.१८ जानेवारी २०१३ मध्ये जो निर्णय दिला त्यामध्ये State Government  shall not grant any permission for istallation of any statue or construction of any structure in public roasds pavements, side ways and other public utility places, obviously, this order shall not apply to installation of high mast lights, street lights of construction relating to electrification, traffic, toll of for development and beautification of the streets, highways, roads etc. and relating to public and  facilities.

असे म्हटलेले असल्यामूळे  निश्चित करण्यात आलेल्या जागेवर भगवान गौतम बुध्दाची मुर्ती बसविण्यास अडचण येत आहे. मला सभागृहाला एकच विनंती करावयाची आहे की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने ज्या ज्या महापुरुषांचे पुतळे बसविण्याचा निर्णय घेतलेला आहे ते बसविण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय दि.२ फेब्रूवारी २००५ नुसार व या निर्णयातील १६ मार्गदर्शक सुचनाची पुर्तता करुन शासनाचे इनप्रींन्सीपल ॲप्रूव्हल घेणे आवश्यक आहे, शासन मान्यतेशिवाय त्यावर आपण कोणत्याही  प्रकारचा खर्च करु शकत नाही. महापौरांना विनंती आहे, शहरात ज्या ज्या महापुरुषांचे पुतळे बसवावयाचे आहे त्या पुतळयाच्या जागा निश्चितीचा ठराव सर्वसाधारण सभेकडून मंजुर करुन द्यावा,आपण महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळा बसविण्यासंबधी गंभिरपणे चर्चा करीत आहोत परंतु हा

पुतळा बसविण्यासाठी महानगरालिकेने जागा निश्चिती केलेली आहे काय त्यास महाराष्ट्र शासनाची इन प्रीन्सीपल एप्रूव्हल घेतले आहे काय या पुतळयाची प्रक्रियाच पुर्ण झालेली नाही, हीच बाब कै.वसंतरावजी नाईक, इतर महापुरुषांच्या पुतळयाच्या बाबतीत आहे. पुतळे बसविण्यास परवानगी देतो कोण, परवानगी देते महाराष्ट्र शासन, आपण पुतळयासंबंधी गंभिरपणे चर्चा करीत आहोत ती नियमानुसार आहे काय मला तरी होकार्थी दिसत नाही. त्यामूळे महाराष्ट्र शासनाने पुतळे बसविण्यासाठी परवानगी देण्याचे संदर्भात शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्या निर्णयातील अटी व शर्तीची पुर्तता करुन १३ जानेवारी २०१३ च्या उच्च न्यालयालाच्या आदेशानूसार परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनास सादर करणे आवश्यक आहे,असे मला वाटते. मला शहरातील सर्व नागरीकांना व सभागृहाला सांगावयाचे आहे की प्रशासन महापुरुषांचे पुतळे बसविण्याच्या संदर्भात गंभिरपणे आपणा बरोबर आहे. जगज्योती महात्मा बसवेश्वर हे बाराव्या शतकातील मोठे समाज सुधारक होवून गेलेले असून त्यांचे सर्वच क्षेत्रात समाजाकरीता खुप मोठे योगदान राहिलेले आहे. त्यांचे महाराष्ट्र, कर्नाटक, तामिलनाडू, आंन्ध्र प्रदेश या राज्यात खुप मोठे अनुयायी आहेत, त्यांचे विषयी सर्वाना आदर आहे त्यामूळे त्यांचा शहरात पुतळा बसविलाच पाहिजे यामध्ये कुणाचेही दुमत नाही.

**विश्वास कदम** दरवर्षी महापुरुषांची जयंती व पुण्यतिथी साजर करतांना त्यांच्या पुतळयास पुष्पहार टाकण्यासाठी जातो परंतु पुतळयाजवळ बसण्यासाठी कोणत्याच प्रकारची सुविधा नाही माझी विनंती आहे की सर्व पुतळयाजवळ बसण्यासाठी सिमेट क्रॉक्रीटचे बेड करण्यात यावे.

**अंजली गायकवाड** सर्व प्रथम मी सर्वाना नविन वर्षाच्या हार्दीक शुभेच्छा देते.सभागृहात महात्मा बसवेश्वराचा पुतळा लवकरात लवकर बसविण्यासाठी मागणी करण्यात येत आहे.शहरात महात्मा बसवेश्वराचा पुतळा लवकरात लवकर बसविण्यात आला पाहिजे या मागणीस माझाही पाठिंबा आहे, मी एका गोष्टीची आठवण करुन देते, महापौर पदाचा व्यक्ती जरी बदलला तरी महापौराचे कार्य बदलत नाही हा शब्द आपण लक्षात घ्यावा.मी सिडको भागातील डॉ.बाबासाहेब आबेडकर चौकाचे सुशोभिकरणावर प्रकाश टाकते. श्री अ.सत्तार हे महापौर असतांना त्यांनी सर्वसाधारण सभेत सिडको भागातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकाचे सुशोभिकरणासाठी एक कोटीचा निधी देवून चौकाचे सुशोभिकरण करण्यात येईल असे आश्वासन दिले होते, आज त्या गोष्टीस जवळपास दिड दोन वर्ष होत आहे. परंतु अद्याप चौकाचे सुशोभिकरण करण्यात आलेले नाही. महापौर मॅडमला माझी एवढीच विनंती आहे की तत्कालिन महापौरांनी दिलेल्या आश्वासना प्रमाणे लातूर रोडवरील आंबेडकर चौक सुशोभिकरणाची कार्यप्रणाली यापुढेही चालूच ठेवून लवकरात लवकर या चौकाचे सुशोभिकरण करण्यात यावे.

आयुक्त साहेबांनी भगवान गौतम बुध्दाची मुर्ती बसविण्यासाठी जी जागा निश्चित करण्यात आली होती त्या जागेत भगवान गौतम बुध्दाची मुर्ती बसविता येणार नाही असे सांगितलेले आहे ,परंतू पर्यायी जागा सुचविण्यासाठी आम्हाला काही कळविलेले नाही. ज्या ठिकाणी भगवान गौतम बुध्द मुर्तीची विटंबना होणार नाही, मुर्तीचे संरक्षण होईल अशा दोन तीन सुरक्षित जागा आमच्या लक्षात आहेत जर आम्हाला जागा सुचविण्यास सांगितले तर आम्ही जागा सुचवू जेणे करुन आपण भगवान गौतम बुध्दाची मुर्ती बसविण्याची वाटचाल करु शकू. इतरही महापुरुषांची पुतळे बसविण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करुन मान्यता मिळविण्यासाठी सर्वानी एकत्रित प्रयत्न करावा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक सुशोभिकरणाच्या बाबतीत खुलासा करण्यात यावा.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** अंजलीताईनी भगवान गौतम बुध्दाची मुर्ती बसविण्यासाठी जागा शोधण्याचा पुढाकार घ्यावा त्यांनी सुचविलेल्या जागेत भगवान गौतम बुध्दाची मुर्ती बसविण्यास आमचा पाठिंबा राहिल. श्री अ.सत्तार हे महापौर असतांना त्यांनी लातूर रोडवरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकाचे सुशोभीकरण करण्यासाठी एक कोटीचा निधी देण्यात येईल असे आश्वासन दिले होते व त्याप्रमाणे अंदाजपत्रकात चौकाचे सुशोभिकरणासाठी एक कोटीची तरतूदही केली होती. श्री अ.सत्तार यांनी दिलेल्या शब्द पाळला आहे.अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आल्या प्रमाणे सौ. अंजलीताईनी दुस-याकडे बोट दाखविण्यापुर्वी या चौकाचे सुशोभिकरण करण्याकरीता आपण सुशोभिकरणाचे कामासाठी आयुक्त साहेबांकडे, संबंधित विभागाच्या अभियंत्यांकडे किती वेळेस पाठपुरावा केला,याकरीता आपण काय प्रयत्न केला हेही सांगावे. शहरातील सर्व विकासाची कामे ही सर्वानी मिळून करावयाची आहेत.त्यास सर्वानी सहकार्य करावे.

**अंजली गायकवाड** प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केलेला आहे,लेखी निवेदने दिलेली आहे. दिलेल्या आश्वासनाची महापौर मॅडमना व आयुक्त साहेबांना मी आठवण करुन देत आहे.

**सरजितसिंघ गिल** शहरात महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा बसविण्यासाठी महापौर व आयुक्त साहेब सर्व सभागृह प्रयत्नशिल आहे. तसेच माजी मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक कै. सुधाकररावजी डोईफोडे यांचाही पुतळा उभारण्यास मान्यता देण्यात आलेली आहे त्यांचे पुतळयासह इतरही महापुरुषांचे पुतळे बसविण्यासाठी शासनाकडून लवकरात लकवर परवानगी आणून बसविण्यात यावेत. श्री किरण कुरुंदकर हे आयुक्त असतांना मी साधारण सभेत नांदेडच्या विमानतळास श्री गुरुगोंवदसिंघजी यांचे नांव देण्याचा प्रस्ताव मांडला होता त्यास सभागृहाने एकमताने मान्यता दिली होती ,श्री किरण कुरुंदकर यांनी महानगरपालिकेचा ठराव

केंद्र शासनास सादर करुन केंद्र शासनास पाठपुरावा केला होता, व केंद्र शासनाने महानगरालिकेच्या मागणी नुसार नांदेड विमानतळास श्री गुरुगोविंदसिघजी यांचे नांव दिलेले आहे, नांदेड येथे शिखांचे दहावे गुरु श्री गुरुगोविदसिंघजी यांचे वास्तव्य होते म्हणूनच संपूर्ण जगात नांदेड शहर ओळखले जाते व त्यांच्यामूळे केंद्र शासनाकडून नांदेडला विकास कामासाठी मोठया प्रमाणात निधी मिळालेला आहे. सभागृहास माझी विनंती आहे. दरवर्षी श्री गुरुगोविंदसिंघजी यांची जयंती दिवशी पुर्ण देशभरात व राज्यात सार्वजनिक सुटी जाहिर करण्यासाठी केंद्र व राज्य शासनास एकमताने शिफारस करण्यात यावी.आयुक्त साहेबानी सार्वजनिक सुटी जाहिर करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडे पाठपुरावा करावा असा माझा प्रस्ताव आहे यास सभागृहाने एकमताने मान्यता द्यावी.

**दिपकसिंह रावत** श्री सरजितसिंघ गिल यांनी श्री गुरुगोविदसिंघजी यांच्या जयंती दिनी सार्वजनिक सुटी जाहिर करण्यासाठी केंद्र व राज्य शासनास शिफारस करण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**स.शेर अली** संपुर्ण जगात नांदेड शहर हे शीखांचे दहावे गुरु श्री गुरुगोविंदसिंघजी यांचे नांवाने ओळखल्या जाते.त्यांच्या जयंती दिनी सार्वजनिक सुटी जाहिर करण्याचा जो प्रस्ताव श्री गिल साहेबांनी मांडलेला आहे त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री सरजितसिंघ गिल यानी मांडलेल्या प्रस्तावाप्रमाणे श्री गुरुगोविंदसिघजी यांच्या जयती दिनी सार्वजनिक सुटी जाहिर करण्यासाठी केंद्र व राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.९९** **ठराव**

शिखांचे दहावे गुरु श्री गुरु गोविंदसिंघजी यांच्या जयंती निमित्य संपूर्ण देशात व महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक सुटी जाहिर करावी अशी शिफारस ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते केंद्र व राज्य शासनास करते.

**डॉ.करुणा जमदाडे** मागील दिड वर्षापासून आम्ही सिडको भागातील डॉ.आंबेडकर चौकाचे सुशोभिकरणाची मागणी करीत आहोत.माजी महापौर श्री अ.सत्तार यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे या चौकाचे सुशोभिकरणासाठी अंदाजपपत्रकात १ कोटीची तरतूद केलेली आहे.त्याप्रमाणे आम्ही वारंवार या चौकाचे सुशोभिकरणासाठी आयुक्त साहेबांचकडे मागणी करीत आहोत, आयुक्त साहेबांनी लातूर रस्ता हा महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (बी.एण्ड सी.) विभागाचा असून यारस्त्यावर महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही असे सांगितले होते. त्यावेळी मी त्यांना या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येणार असल्यामूळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिक्षक अभियंता यांना नव्याने चौकाचे सुशोभिकरणासाठी परवानगी देण्यासाठी विनंती करण्यात यावी असे सुचविले होते. ज्या महापुरुषांनी समाजासाठी आपले उभे आयुष्य वाहिले ज्यांनी समाजाला दिशा देण्याचा प्रयत्न केला अश्या आदर्श महापुरुषाचे पुतळे सन्मानापुर्वक निश्चित करण्यात आलेल्या जागेत बसविले पाहिजे ही सर्वाची मागणी आहे. आयुक्त साहेबांनी सांगितले की, भगवान गौतम बुध्दाची मुर्ती बसविण्यासाठी जागेची अडचण आहे. याबाबतीत मी आमचे नेते खा.श्री अशोकरावजी चव्हाण यांचेशी ही चर्चा केली होती. भगवान गौतम बुध्दाची मुर्ती बसविण्यासाठी जागेची अडचण असल्यामूळे पर्यायी जागेचे पत्र मी मा.महापौर व मा.आयुक्त साहेबांना दिले होते.हैद्राबाद शहरातील जलाशयात भगवान सिध्दार्थ गौतम बुध्दीची मुर्ती बसविण्यात आलेली आहे त्याच धर्तीवर गोदावरी नदीच्या पात्रात भगवान गौतम बुध्दाची मुर्ती बसविण्यात यावी जेणे करुन शहराच्या सौंदर्यात भर पडेल. जागा संपादन करणेसाठी पैसेही द्यावे लागणार नाही, नागरीकांचे मनोरंजन होईल, अशा प्रकारचा प्रस्ताव मी दिलेला आहे. तरी माझ्या प्रस्तावावर सभागृहाने विचार करावा.

**आयुक्त** सौ.अंजलीताई गायकवाड व सौ.करुणाताई जमदाडे यांनी लातूर रोडवरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकाचे सुशोभिकरणाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे याबाबत मला स्पष्ट सांगावयाचे आहे की, लातूर रस्ता हा शासनाच्या सार्वजनिक विभागाच्या अखत्यारीतील रस्ता असून शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येत नसल्यामूळे सध्या अस्तित्वात असलेले स्ट्रक्चर मध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करता येत नाही आहे ते कायम ठेवावयाचे आहे. तरी पण रस्ता रुंदीकरण होत असेल तर या चौकाचे विस्तारीकरण करण्यासाठी परवानगी देण्यासाठी पुनश्च अधिक्षक अभियंता,सा.बा.वि.यांना विनंती करण्यात येईल. त्यांच्या मंजुरीने पुढील कार्यवाही करता येईल.

**स.शेर अली** मी यापुर्वी सर्वासाधारण सभेत मुस्लीम बांधवाच्या कब्रस्थानकरीता कॉटन रिसर्च सेंटरची २ एकर जागा आरक्षित करण्याचा प्रस्ताव दिला होता त्याप्रमाणे आयुक्तांनी कॉटन रिसर्च सेंटरची २ एकर जागेत मुस्लीम कब्रस्थान आरक्षणाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी मान्यता देण्याचा प्रस्ताव दिला होता तो महापौरांनी विषय पत्रिकेवर का घेतला नाही याचा खुलासा करावा.

(यानंतर श्री स.शेर अली,श्री अ.हबीब अ.रहिम बागवान, श्री कुरेशी चॉदपाशा खाजा, श्री फारुख हुसेन कासिम साब, श्री बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला हे सदस्य मा.महौपार यांचे आसनासमोर जावून त्यांनी धरणे धरली व नंतर मा.महापौर यांच्या टेबलवरील राजदंड घेवून सभागृहाबाहेर गेले यावेळी

मोठया प्रमाणात गोधळ निर्माण झाला घोषणाबाजी होवून राजदंड घेवून जाणा-या सदस्यांचे विरोधात कार्यवाही करण्यात यावी त्यांना निलंबित करण्यात यावी अशी मागणी बहुसंख्य सदस्यांनी महापौराकडे केली.)

**महापौर** महासभेच्या विषय पत्रिकेवर कोणते विषय घ्यावयाचे या बाबत निर्णय घेण्याचे अधिकार महापौर असतांनाही श्री स.शेर अली व त्यांचे पक्षाचे सदस्यांनी कब्रस्थानचा प्रस्ताव का घेण्यात आला नाही याबाबत खुलासा करण्याची मागणी केली जी चुकीची आहे.श्री स.शेर अली,श्री अ.हबीब अ.रहिम बागवान, श्री कुरेशी चॉदपाशा खाजा, श्री फारुख हुसेन कासिम साब, श्री बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला हे सदस्य राजदंड घेवून सभागृहा बाहेर पळून गेले त्यांची हि वर्तणूक अत्यंत गैरशिस्तीची असल्यामूळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनूसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मी त्यांना निलंबित करीत आहे. श्री स. शेर अली व इतर सदस्य राजदंड घेवून पळून गेलेले असल्यामूळे १० मिनिटा करीता (४.१० ते ४.२० वाजेपर्यत) सभा तहकुब करण्यात येते.

**१० मिनिटानंतर पुन्हा सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.**

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** श्री शेर अली व एमआयएमच्या सदस्यांनी महापौरांनी कब्रस्थानचा प्रस्ताव विषय पत्रिकेवर का घेतला नाही म्हणून महापौंराच्या आसनासमोर धरणे धरली व त्यानंतर राजंदड सभागृहाबाहेर पळवून नेला ही घटना खरोखरच दूर्देवी आहे. सभागृहात अत्यंत गैरशिस्त होत असल्यामूळे महापौरांनी एमआयएमच्या सदस्यांना निलंबित केले. श्री शेर अली यांनी दिड वर्षापुर्वी श्री अ.सत्तार हे महापौर असतांना कब्रस्थान आरक्षणाचा प्रस्ताव मांडला होता त्यास या सभागृहाने मान्यता दिली होती नुसार प्रशासनाने कब्रस्थान करीता जागा आरक्षणाचा प्रस्ताव दिलेला आहे. विषय पत्रिकेवर कोणते विषय घ्यावयाचे याचा अधिकार महापौराना असल्यामूळे त्यांनी तो प्रस्ताव आजच्या सभेत घेण्याकरीता मान्यता दिली नसेल पुढच्या सभेत घेतील त्यासाठी एवढे आंदोलन करण्याची काय गरज आहे. पुढील सभेत या प्रस्तावावर आपणास निर्णय घेता येईल.

**बाळासाहेब तरोडेकर** एमआयएमच्या सदस्यांनी सभागृहात गैरवर्तन करुन राजदंड घेवून सभागृहा पळून गेले त्यांमूळे सभागगृहाच्या मागणीनूसार महापौरानी या सदस्याना तीन महिण्याकरीता निलंबित केलेले असतांना ते पुन्हा सभागृहात कसे काय आले.आम्ही कचरा टाकला म्हणून आमचेवर गुन्हे दाखल केलेले आहेत, निलंबित सदस्यांनी सभागृहा बाहेर जावे, त्याशिवाय मी खाली बसणार नाही.

**दिपकसिंह रावत** मागच्या कॉन्सीलमध्ये शिवसेना पक्षाच्या सदस्यांनी सभागृहात कचरा फेकला म्हणून शिवसेना सदस्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता.एमआयएमच्या सदस्यांनी सभागृहात गैरवर्तन केले राजदंड पळून नेला म्हणून महापौरांनी निलंबित केलेले असतांना ते सभागृहात कसे काय येवू शकतात, महापौराना दिलेले रुलींग बदलता येत नाही.

**अ.सत्तार** श्री शेर अली व एमआयएमच्या सदस्यांनी कब्रस्थानचा विषय विषय पत्रिकावर का घेतला नाही म्हणून महापौरांच्या आसनासमोर धरणे धरली राजंदड पळून नेला हे कृत्यू सभागृहाचा अवमान करणारे आहे. मी महापौर असतांना श्री शेर अली यांनी कब्रस्थानचा प्रस्ताव सभागृहात मांडला होता व तो आपण पास केला होता त्यानुसारच कब्रस्थानचा प्रस्ताव प्रशासनाने दिलेला आहे.त्यांवर आपणास निर्णय घेता येईल केवळ श्रेय घेण्यासाठी हा प्रकार घडलेला आहे,श्री शेर अली व इतर एमआयएमच्या सदस्यांना माफ करण्यात यावे. यापुढे त्यांनी सभागृहाचा मान सन्मान ठेवावा, अधिनियमातील तरतूदीनूसार ज्या सदस्यांना निलंबित केले त्यांना सभगृहात येता येत नाही. परंतु निलंबित केलेले सदस्य सभागृहात आले त्यांना महापौरांनी माफ करावे अशी विनंती आहे.

**बाळासाहेब तरोडेकर** महापौरांनी तीन महिण्याकरीता निलंबित केलेले असल्यामूळे निलंबित सदस्यांना सभागृहात बसण्याचा अधिकार आहे काय

**अ.सत्तार** महापौरांनी विषय पत्रिका सुरु करावी.

**विषय क्र.१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | जानेवारी | १३११ | ११८८ | २४११ | ९०६.१७ |
| २ | फेब्रूवारी | १००४ | ९४१ | १९४५ | ९३७.२५ |
| ३ | मार्च | १०३३ | ९७७ | २०१० | ९४५.७८ |
| ४ | एप्रिल | १४७२ | १३२२ | २७९४ | ८९८.०९ |
| ५ | मे | ९८३ | ९१५ | १८९८ | ९३०.८२ |
| ६ | जून | १२२० | ११४९ | २३६९ | ९४१.८० |
| ७ | जूलै | ११२३ | ९४७ | २०७० | ८४३.२७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | ऑगस्ट | ११६१ | १११० | २२७१ | ९५६.०७ |
| ९ | सप्टेंबर | १७०३ | १५४३ | ३२४६ | ९०६.०४ |
| १० | ऑक्टोबर | १५६८ | १४१८ | २९८६ | ९०४.३३ |

**महापौर** नोंद घेण्यात येते

**ठराव क्र.१००** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | जानेवारी | १३११ | ११८८ | २४११ | ९०६.१७ |
| २ | फेब्रूवारी | १००४ | ९४१ | १९४५ | ९३७.२५ |
| ३ | मार्च | १०३३ | ९७७ | २०१० | ९४५.७८ |
| ४ | एप्रिल | १४७२ | १३२२ | २७९४ | ८९८.०९ |
| ५ | मे | ९८३ | ९१५ | १८९८ | ९३०.८२ |
| ६ | जून | १२२० | ११४९ | २३६९ | ९४१.८० |
| ७ | जूलै | ११२३ | ९४७ | २०७० | ८४३.२७ |
| ८ | ऑगस्ट | ११६१ | १११० | २२७१ | ९५६.०७ |
| ९ | सप्टेंबर | १७०३ | १५४३ | ३२४६ | ९०६.०४ |
| १० | ऑक्टोबर | १५६८ | १४१८ | २९८६ | ९०४.३३ |
| ११ | नोंव्हेबर | | | | |
| १२ | डिसेंबर | | | | |

**विषय क्र.२**

शासन निर्णयानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाबत संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्यातील सर्वसाधारण सभेच्या विषय सूचीवर कायमस्वरुपी समावेश करुन या विषयाचा सविस्तर आढावा सभेमध्ये घेण्यात यावा असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर

**<u>प्रशासकीय अहवाल</u>**

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान**

**आज पर्यत झालेली कार्यवाही**

**एकूण प्राप्त अर्जाची संख्या - ४९०९**

**एकूण पात्र लाभार्थी - २५८६**

**एकूण अपात्र लाभार्थी - २३२३**

पात्र लाभार्थ्यांना शौचालय बांधून देणेसाठी काम कंत्राटदारामार्फत करुन घेण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने दि.२३.१२.२०१५ रोजी ठराव क्र.१८५ नूसार मान्य केलेला असून त्यानूसार पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात येते आहे. मार्च २०१६ अखेर १७०० वैयक्तीक शौचालयाचे बांधकामाचे उदिष्ट ठरविण्यात आलेले आहे.

**महापौर** स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र. १०१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने मागील महिण्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत खालील प्रमाणे केलेल्या कार्यवाहीची नोंद हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**एकूण प्राप्त अर्जाची संख्या - ४९०९**

**एकूण पात्र लाभार्थी - २५८६**

**एकूण अपात्र लाभार्थी - २३२३**

पात्र लाभार्थ्यांना शौचालय बांधून देणेसाठी काम कंत्राटदारामार्फत करुन घेण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने दि.२३.१२.२०१५ रोजी ठराव क्र.१८५ नूसार मान्य केलेला असून त्यानूसार पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात येते आहे. मार्च २०१६ अखेर १७०० वैयक्तीक शौचालयाचे बांधकामाचे उदिष्ट ठरविण्यात आलेले आहे.

**विषय क्र.३**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील शांतता क्षेत्र अधिसुचित करण्यात आली असून त्याअनुषंगाने शांतता क्षेत्र अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली त्याची नोंद घेणे बाबत.

**महापौर** नोंद घेण्यात येते.

ठराव क्र.१०२ ठराव

नांवामनपा सर्वसाधारण सभेने दि.२७.८.२०१५ ठराव क्र.३१ अन्वये मान्यता दिल्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील शांतता क्षेत्र अधिसुचित करण्यात आले असून त्याअनुषंगाने शांतता क्षेत्र अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली त्याची नोंद ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**बाळासाहेब तरोडेकर** एमआयएमच्या सदस्यांना निलंबित करण्यात आलेले आहे त्यांना सभागृहात बसण्याचा अधिकार आहे काय ते सभागृहाचे भान ठेवित नाही आम्हाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या अधिकारानूसार आम्ही सभागृहात बोलत आहोत सभागृह नेते महापौरांना एकेरी आरे तूरे बोलत आहेत त्याचा मी निषेध करतो सभागृह नेत्यांनी सभागृहाची माफी मागावी.

**अ.सत्तार** महापौरांनी पुरवणी विषय पत्रिका सुरु करावी.

**अशोक उमरेकर** एमआयएमच्या सदस्यांनी राजंदडाची इज्जत ठेवली नाही त्यांनी राजंदंड पळून नेलेला आहे..महापौरांना हात जोडून विनंती आहे की,एमआयएमच्या सदस्यांना निलंबित केलेले असतांनाही ते सभागृहात आलेले आहे त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी,

**बाळासाहेब तरोडेकर** एमआयएमच्या सदस्या विरुध्द ३५३ चा गुन्हा नोंदविण्यात यावा

**विनय पाटील** विरोधी पक्षाचे सदस्य बोलत असताना आम्ही त्याना अडथळ आणला नाही आता आम्ही बोलत असताना त्यानी अडथळा आणू नये.गेल्या काही दिवसापूर्वी सिडको हडको भागातील लातूर रोड डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते ढवळे कॉर्नर पर्यतच्या मुख्य रस्त्यांचे कामासाठी निविदा काढण्यात आल्या होत्या

**अशोक उमरेकर** महापौरांनी पहिले आमच्या प्रश्नाचा खुलासा करावा.

**विनय पाटील** प्रत्येक बाबीचा खुलासा मागण्याचा अधिकार फक्त विरोधी पक्षाच्या सदस्यांनाच आहे काय आता आम्हाला बोलू द्यावे आम्ही बोलत असतांना अडथळा आणू नये.

**अशोक उमरेकर** आम्ही महापौरांकडून खुलासा मागवित आहोत,तुमचे ऐकायला आम्ही तुमच्या बापाचे नौकर नाही,

( त्यानंतर श्री विनय पाटील व श्री अशोक उमरेकर यांनी एकमेका विषयी अपशब्द वापरले व त्यानंतर या दोन्ही सदस्यात झटपटी झाल्या या झटापटीत त्यांनी आपआपल्या समोर असलेले माईक तोडून एकमेकाच्या अंगावर फेकुन मारले,यामूळे सभागृहात जवळपास २० मिनिटे गोंधळ चालू होता)

**महापौर** मला स.सदस्यांना सांगावयाचे आहे की स.सदस्यांनी गैरवर्तणूक करु नये कोणासही असांसदिय भाषा वापरुन एकेरीवर बोलू नये सभागृहात ५० महिला सदस्या आहेत यांचे सर्व स.सदस्यांनी भान ठेवून वर्तणुक करावी. मला श्री बाळासाहेबांना सांगावयाचे आहे की.तुम्ही पहिले एकेरी शब्द वापरला, सभागृहात कोणाला बोलण्याची परवानगी द्यावयाची याचा अधिकार मला आहे त्यामूळे मला कोणी सुचना करु नये. सभागृहात महापौरा विषयी व्यक्तीगत कोणी सदस्य चुकीचे बोलून महापौरांचा अवमान करीत असेल तर ते यापुढे खपवून घेणार नाही.सभागृहात गैरवर्तन करणा-या सदस्याविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.याची सर्वानी नोंद घ्यावी.

**बाळासाहेब देशमूख** आपण एका पक्षाचे महापौर नाही सर्व शहराचे महापौर आहेत सर्वाना समानतेने वागणूक द्यावी.

**महापौर** माजी स्थायी समिती सभापती यांनाही सांगावयाचे आहे की आपण यापुर्वीही माईक फेकून तोडला होता आता दुस-यांदा माईक फेकुन माईकची तोडफोड केलेली आहे.

**विनय पाटील** महापौर मॅडम आपण लावलेला आरोप मला मान्य आहे परंतु सभागृहात कोणाचे आई बाप काढावयाचे नसते,मला या सभागृहापेक्षा माझे आई वडील मोठे आहे.

**महापौर** श्री विनय पाटील व श्री अशोक उमरेकर यांनी सभागृहात यापूढे असे गैरवर्तन करु नये.अशी ताकीद त्यांना देण्यात येते, सभागृहात बसविण्यात आलेली माईक व इतर फर्निचर ही सार्वजनिक मालमत्ता असून स.सदस्य याची तोडतोफ करुन सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करीत असल्यामूळे जनमानसात महानगरपालिकेची प्रतिमा मलिन होत आहे . स.सदस्यांनी असासंदिय भाषा वापरुन गैरवर्तणुक करु नये कोणाचाही अवमान करु नये. महापौरांना उध्देशूनच सर्वानी बोलावे अशी सर्वाना विनंती करण्यात येते,मला आयुक्ताकडून खुलासा हवा आहे की, मी महापौर झाल्यापासून ६ सर्वसाधारण सभा घेतल्या, आमचे नेते व जिल्हयाचे खासदार श्री अशोकरावजी चव्हाण यांच्या उपस्थितीतही माझ्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेतील विविध योजनेचा आढावा घेण्यासाठी समन्वय बैठका घेतलेल्या आहे त्यावेळी शहरात महात्मा बसवेश्वराचा पुतळा व इतर महापुरुषाचे पुतळे बसविण्याच्या संदर्भात चर्चा करण्यात आली होती खासदार साहेबांना शहरात महापुरुषांची पुतळे बसविण्याच्या संदर्भात माहिती देण्यात आली त्यावेळी आयुक्त साहेबानी पुतळे बसविण्याच्या संदर्भात शासनाचे इन प्रिंन्सीपल ऍप्रूव्हल घेणे आवश्यक असल्याचे सांगितले नव्हते आणि आज महात्मा बसवेश्वराचा पुतळा बसविण्यासाठी शासनाकडून इन प्रिन्सीपल एप्रूव्हल घेणे आवश्यक असल्याचा नविनच खुलासा केलेला आहे,आयुक्त साहेबांनी त्याच वेळी शासन निर्णयाची व १३ जानेवारीच्या न्यायालयीन आदेशाची माहिती देवून यास शासनाची इन प्रिन्सीपल एप्रूव्हल घेणे आवश्यक आहे असे सांगितले असते तर आपण चार पाच महिण्यापुर्वीच तशा प्रकारचा ठराव पारीत करुन शासनास सादर केला असता, आयुक्त साहेबांनी

चुकीचे बोलून सभागृहाची दिशाभूल करु नये जे खरे आहे तेच व्यवस्थीत सभागृहात सांगावे. आयुक्त साहेबांनी खासदार साहेबाचे उपस्थितीत घेण्यात आलेल्या बैठकीत शासनाचे इन प्रिन्सीपल एप्रूवहल घेणे आवश्यक असल्याची माहिती का दिली नाही याचा खुलासा आयुक्त साहेबांनी करावा.

दुसरा खुलासा काल हैदरबाग येथे ड्रेनेज चेंबरमध्ये मजुराचा मृत्यू झाला, दिड वर्षापुवीही अशीच घटना घडली होती ज्यावेळेस महानगरपालिकेच्या कामासाठी कंत्राटदारास कंत्राट देण्यात येते तेंव्हा ते काम करण्यासाठी कंत्राटदाराने लावण्यात आलेल्या मजुरांचे संरक्षण करण्याची पुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असते, कंत्राटदाराने निविदा व अटीनुसार मजुरांचे संरक्षण करण्यासाठी ज्या बाबी अवलंबवायाच्या असतात त्या अवलंबवितो किंवा नाही हे पाहण्याचे काम महानगरपालिका प्रशासनाचे असते, कंत्राटदारास कामाचे आदेश दिले की प्रशासनाची जबाबदारी संपली असे नाही असे मी मानते, काल एक घटना घडली दिड वर्षापुर्वीही अशीच घटना घडली अशा घटना वारंवार घडत असतील तर ही मानवीय हानी आहे. त्यामूळे कत्राटदाराची चौकशी करुन शासन करावे फक्त शासन करुन चालणार नाही तर निविदेतील अटी व शर्तीनुसार त्यांचा फायनान्शीयल लॉस करावा जेणे करुन भविष्यात अशा प्रकारच्या मानवीय हानीच्या घटना घडणार नाही. पुतळयाच्या संदर्भात आयुक्तानी खुलासा करावा. महात्मा बसवेश्वराचा पुतळा बसविण्यासाठी शासनाची इन प्रिन्सीपल एप्रूव्हल घेण्याकरीता महासभेच्या ठरावाची आवश्यकता लागत असेल तर आजच्या सभेत या ठरावास हे सभागृह मान्यता देत आहे.

**आयुक्त** महापौरांचे मी अभिनंदन करतो की त्यांनी सभागृहात चांगला मुध्दा मांडला,मुळात ही जी बाब आहे ती माझ्या कार्यकाळातील नाही ज्यावेळेस महापुरुषांचे पुतळे बसविण्यास मान्यता देण्यात आली त्यावेळेस प्रशासनाने शासन मार्गदर्शक सुचनाची माहिती देण्यात आली किंवा नाही याची मला कल्पना नाही परंतु सरक्युलेशनने मी त्याचा उत्तरदायी आहे, मला सभागृहाला हे सांगावयाचे आहे की, आज पर्यत महासभेने घेतलेल्या निर्णयानुसार देशात ,राज्यात महापुरुषांचे पुतळे झालेले आहे काय , १३ जानेवारीचा २०१३ उच्च न्यायालयाचा जो आदेश आहे त्या आदेशाच्या आपण पूढे जावूच शकत नाही, आपली ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे याचे भान सभागृहाने ठेवावे. शासनाचा डेप्युटेड अधिकारी म्हणून माझ्या ज्या कर्तव्याच्या बाबी आहे त्या मी सभागृहासमोर मांडलेल्या आहेत.यापेक्षा जास्त खुलासा करण्याची मला आवश्यकता वाटत नाही.

**महापौर** खासदार श्री अशोकरावजी चव्हाण सांहेबांचे उपस्थिती जी मिटिग घेण्यात आली त्यावेळी महात्मा बसवेश्वराचा पुतळा बसविण्यासाठी शासनाची इनप्रिन्सीपल एप्रूव्हल घेणे आवश्यक असल्याचा खुलासा का करण्यात आला नाही.

**आयुक्त** ज्यावेळी खासदार श्री अशोकराव चव्हाण साहेबांच्या उपस्थित बैठक झाली त्यावेळी खासदार साहेबांनी हेच सांगितले की, महाराष्ट्र शासनाकडे सर्व बाबीची पुर्तता करा, शासनास पुन्हा पुन्हा पत्र लिहा त्याप्रमाणे शासनास विनंती पत्र दिलेले आहे यासर्व बाबी इतिवृत्तांत आलेल्या आहेत सभागृहास वेळ असेल तर १० मिनिटात या बैठकीचे इतिवृत्त मागविता येईल.

**दिपसिंह रावत** आयुक्त साहेब महापौर मॅडमनी यांनी सांगितल्या प्रमाणे मा.खासदार श्री अशोकराव चव्हाण साहेबानी जी मिटिग घेतली ती मिटिंग औपचारीक होती का अनौपचारीक मिटिग होती याचा खुलासा करण्यात यावा. खासदार साहेबांचे उपस्थितीत जी मिटिंग घेतली त्या मिटींगचा आणि सर्व सर्वसाधारण सभेचा काही संबंध नाही पुतळा बसविण्यासाठी संबंधित जागा मालक जागा देत नसेल तर एमआयएमच्या नगरसेवकांनी कब्रस्थानकरीता जागा आरक्षीत करण्याचा जसा प्रस्ताव दिला होता त्याच प्रमाणे महात्मा बसवेश्वराचा पुतळा बसविण्यासाठी सदरची जागा आरक्षित करण्याचा प्रस्ताव आम्हाला देता येतो काय याचा खुलासा नगरसचिवांनी करावा. तसा प्रस्ताव देता येत असेल तर आम्ही या प्रस्तावास एकमताने मान्यता देतो. खासदार साहेबांच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या सभेत काय घडले याची आम्हाला काहीच माहिती नाही.

**आयुक्त** या सभागृहास ज्या बाबी घडतात त्याच औपचारीक असतात इतर बाबीचे उत्तर हे माझ्या कक्षेच्या बाहेर आहे याबाबत महापौरांनीच खुलासा करावा.

**दिपकसिंह रावत** आम्ही सुध्दा शहरात महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा उभारण्यासाठी प्रस्ताव दिला होता त्यावेळी पुतळा उभारण्यासाठी शासनाच्या एवढया अटी व शर्ती नव्हत्या आता शासनाच्या अटी व शर्ती जास्त आहेत असे असताना महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा उभारणेसाठी जवळपास १५ वर्ष लागली महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा लवकरात लवकर उभारण्यासाठी जास्त वेळ लागू नये म्हणून शासन निर्देशानूसार अगोदरच पुतळयाची प्रतिमा शासनाच्या कला संचालनालयाकडून मान्य करुन घेवून पुतळयाची निविदा मागविली होती तशीच प्रक्रिया महात्मा बसवेश्वरांचा पुतळयाकरीता करुन निविदा मागविण्याची प्रोसेस करता येईल. जमिनीचा वाद असेल तर संबंधीत जमिन मालकाशी वाटाघाटीकरुन जमिन संपादित करण्यात यावी. राहिला प्रश्न पैश्याचा आपण स्थानिक स्वराज्य संस्थेचे आमदार म्हणून आ.श्री अमरभाऊ राजुकरांना निवडून दिलेले आहे त्यांच्या आमदार निधीतून पैसे घेण्यात यावे . सर्व पक्षिय आमदाराकडून त्यांच्या आमदार निधीतून निधी घेण्यात यावा. आम्ही आमच्या शिवसेना

आमदाराना निधी देण्याची विनंती करुन तुम्ही कॉंग्रेस आमदार खासदाराना निधी देण्यासाठी विनंती करावी. महात्मा बसवेश्वराचा पुतळा बसविण्या करीता हे पुर्ण सभागृह महापौरांच्या पाठीशी आहे.

**प्रमोद खेडकर** खासदार श्री अशोकरावजी चव्हाण साहेबांनी जी मिटिंग घेतली त्यावेळेस विरोधीपक्ष नेत्यास सर्व पक्षाच्या गट नेत्यास बोलावण्यात आले होते काय विरोधी पक्षाच्या नगरसेवकांना बोलाविण्याची गरज आपणास भासली नाही काय

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** खासदार श्री अशोकरावजी चव्हाण साहेबांनी सर्व पक्षाच्या नगरसेवकांना या बैठकीत बोलाविण्यात यावे अशी सुचना केली होती यापुढे अशा बैठकीस सर्व पक्षाच्या नगरसेवकांना निमंत्रीत करण्यात येईल.

**महापौर** पुढच्या वेळेस जेव्हा अशी मिटिंग घेण्यात येईल त्यावेळी सभा पक्षाच्या नगरेसवकांना बोलाविण्यात येईल.

**अशोक उमरेकर** महापौर मॅडम एमआयएमच्या नगरसेवकांनी मानाचा राजदंड पळवून नेलला आहे त्याचे विरुध्द काय कार्यवाही करण्यात येणार आहे याचा खुलासा करण्यात यावा. त्यांना निलंबित करण्यात आलेले असतांनाही ते सभागृहात आलेले आहे.

**विनय गुर्रम** एमआयएमच्या सदस्यांना निलंबित करण्यात आलेले असतांनाही ते सभागृहात कसे काय बसू शकतात याचा खुलासा करण्यात यावा.

**अशोक उमरेकर** महापौर मॅडमना हात जोडून विनंती आहे एमआयएमच्या नगरसेवकांनी राजदंडाची इज्जत ठेवलेली नाही,हा सभागृहाचा अवमान आहे ते निलंबित करण्यात आल्यानंतरही सभागृहात आलेले आहे त्यांचेवर कार्यवाही होत नाही तो पर्यत मी खाली बसणार नाही.

**विषय क्र. ४**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे सुधारीत कलम 31(अ) मधील तरतुदीनुसार व महानगरपालिका व स्थायी समितीचे कामकाज अधिनियमातील 4-ब नुसार पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर संख्या बळानुसार नामनिर्देशनाने ११ (अकरा) सदस्याची नियुक्ती करणे बाबत.

**अशोक उमरेकर** निलंबित करण्यात आलेल्या एमआयएमच्या गटनेत्याकडून नांवाचा लिफाफा स्विकारता येतो काय महानगरपालिकेत ही नविन पध्दत सुरु करण्यात आलेली आहे काय

**महापौर** सभागृह नेते, विरोधी पक्षनेते, गटनेते राष्ट्रवादी, व गटनेते एआयएमआयएम–संविधान आघाडी यांनी बंद पाकीटात दिलेल्या नांवा प्रमाणे पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर १) जमदाडे करुणा भिमराव २) ललिता मुकुंदराव बोकारे, ३) चाऊस हसीना बेगम साबेर , ४) गायकवाड वैजयंती भिमराव ५) मुदिराज कमलाबाई रामस्वामी ६) मोकले सोनाबाई रामचद्र ७) गायकवाड अंजली सुरेशराव, ८) आसिया बेगम अ.हबीब ,९) नागाबाई भूजंगराव कोकाटे, व १०) संगिता पृथ्वीराज राओत्रे ११) सिंधूताई पांडूरंग काकडे या (११) महिला सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले.** महिला व बाल कल्याण समितीवर निवड झालेल्या महिला सदस्यांचे अभिनंदन करण्यात येते.त्यांचा सत्कार करण्यात यावा.तसेच माजी सभापती सौ.कंठेवाड व उपसभापती सौ.रजिया बेगम यांनी चांगले काम केलेले असल्यामूळे त्यांचा ही सत्कार करण्यात यावा.मागील महिला व बाल कल्याण समितीने चांगले काम केलेले आहे तशीचे नविन सभापती व उपसमितीचे सभापती करतील अशी अपेक्षा बाळगु या.

( महिला व बाल कल्याण समितीवर निवड झालेल्या नविन महिला सदस्यांचा व माजी सभापती उपसभापती महिला व बाल कल्याण याचा तसेंच एमआएमचे गटनेते म्हणून श्री बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला याची निवड केल्यामूळे यासर्वाचा मा.महापौर यांनी पुष्पगुच्छ देवून सत्कार केला )

**ठराव क्र.१०३** **ठराव**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 30(1) व सुधारीत कलम 31 (अ) मधील तरतूदीनूसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील मान्यता प्राप्त पक्षाचे तौलनकि संख्याबळ विचारात घेवून सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, एआयएमआयएम-संविधान आधाडी व राष्ट्रवादी पक्षाचे गटनेते यांनी शासन परिपत्रक क्र.संकिर्ण 2010/प्रक्र.-85/नवि-32 दि.6 जूलै 2010 मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर सदस्याची नेमणूक करण्यासाठी बंद पाकीटात दिलेल्या नांवाप्रमाणे पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर खालील प्रमाणे (११) पालिका सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सर्वश्री**

१) जमदाडे करुणा भिमराव, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस व अपक्ष आघाडी
२) ललिता मुकुंदराव बोकारे, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस व अपक्ष आघाडी
३) चाऊस हसीना बेगम साबेर, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस व अपक्ष आघाडी
४) गायकवाड वैजयंती भिमराव, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस व अपक्ष आघाडी

५) मुदिराज कमलाबाई रामस्वामी, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व अपक्ष आघाडी
६) मोकले सोनाबाई रामचंद्र, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व अपक्ष आघाडी
७) अंजली सुरेशराव गायकवाड, एआयएमआयएम–संविधान आघाडी
८) आसिया बेगम अ.हबीब बागवान, एआयएमआयएम–संविधान आघाडी
९) नागाबाई भूजंगराव कोकाटे, शिवसेना व भारतीय जनता पार्टी आघाडी
१०) संगिता पृथ्वीराज राओत्रे, शिवसेना व भारतीय जनता पार्टी आघाडी
११) सिंधुताई पांडुरंग काकडे, राष्ट्रवादी पक्ष

**विनय गुर्रम** एमआयएमच्या सदस्यांना निलंबित करण्यात आलेले असतांनाही ते सभागृहात कसे काय बसू शकतात याचा खुलासा करण्यात यावा.

**अशोक उमरेकर** एमआयएमच्या नगरसेवकांनी राजदंडाची इज्जत ठेवलेली नाही, हा सभागृहाचा अवमान आहे ते निलंबित करण्यात आल्यानंतरही सभागृहात आलेले आहे त्यांचेवर कार्यवाही होत नाही तो पर्यत मी खाली बसणार नाही.

**महापौर** एमआयएम पक्षाचे गटनेते श्री बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला यांनी माझी माफी मागितलेली आहे त्यामूळे मी माझ्या अधिकारात त्यांना निलंबितची शिक्षा माफ केलेली आहे.

**विनय गुर्रम** एमआयएम पक्षाचे गटनेत्यांनी सभागृहाची माफी मागावी.

**(यानंतर स.सदस्य एकमेकावर आरोप करुन एकमेकाशी वाद घालीत होते त्यामूळे सभागृहात कोण काय बोलत होते समजत नव्हते. मा.महापौर विरोधी पक्षाचे सदस्यांना जागेवर बसावे, सभेचे कामकाज शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन करीत होते परंतु त्याचा सदस्यांवर काही परिणाम होत नव्हता. वारंवार विरोधी पक्षाचे सदस्य एमआयएमच्या सदस्यांना निलंबित केलेले असल्यामूळे ते सभागृहात कसे काय येवू शकतात अशी विचारणा करत होते.)**

**अ.सत्तार** विरोधी पक्षांच्या सदस्यांनी गोंधळ घालून सभागृहाचे काम होवू द्यावयाचे नाही असेच ठरविलेले दिसते त्यामुळे विषय क्र.४ मध्ये आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन 2015-16 करिता दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून दलित वस्तीत काम हाती घेण्यासाठी स.सदस्यांनी केलेल्या मागणी नूसार व त्या त्या प्रभागातील कामाची तातडी निकड व आवश्यकता लक्षात घेता विविध प्रभागातील दलित वस्त्यात सार्वजनिक कामे निश्चिती करुन व प्राधान्यक्रम ठरवून हाती घेण्यासाठी महापौरांनी मान्यता द्यावी. विषय पत्रिकेवरील व पुरवणी विषय पत्रिकेवरील सर्व विषयावर नियमानुसार नुसार महापौरांनी मान्यता द्यावी

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** विरोधी पक्षाचे नगरसेवक जाणून बुजून सभेच्या कामकाजास अडथळ आणीत आहेत शहर विकासाचे कामात दिरंगाई होवू नये म्हणून श्री अ.सत्तार यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनूमोदन आहे.पुरवणी विषय पत्रिकेवरील माझा प्रस्ताव क्र. विषय क्र.१८ स्थगित ठेवण्यात यावा.

**महापौर** वारंवार स.सदस्यांना शांततेचे आवाहन करुनही ते आपसात एकमेकावर आरोप प्रत्यारोप करुन गोंधळ करीत असल्याने सभागृहाचे कामकाज व्यत्यय येत असल्यामूळे श्री अ.सत्तार यांनी मांडलेल्या प्रस्तावाप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्र.५**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेकडून 1) व्हीआयपी रोडवर 2) केळी मार्केट, इतवारा 3) पक्की चाळ या तीन ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधलेली असून ती चालवण्यासाठी संस्थाचालकांना भाडेपट्टीवर देण्यात आलेली आहेत आणि बीओटी तत्वावर बांधण्यात आलेले सार्वजनिक शौचालये खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| 1) रिजनल वर्कशॉप | 2) शिवाजीनगर दवाखाना |
| 3) गोकुळनगर | 4) तरोडेकर मार्केट, वजिराबाद |
| 5) महाराजा रणजितसिंघ मार्केट | 6) चौफाळा गार्डन |
| 7) तरोडा नाका | 8)मध्यवर्तीबसस्थानक,उड्डाणपुलाखाली |
| 9) कलामंदीरच्या पाठीमागे | 10) जुना मोंढा टॉवर (दोन जागी) |
| 11) जकात नाका | 12) अण्णाभाऊ साठे, व्हीआयपी रोड |
| 13) देगलूर नाका पुलीस चौकीजवळ | 14) इतवारा जिल्हा परिषद शाळेजवळ |
| १5) सिडको उद्यानाजवळ | 16) नंदीग्राम मार्केट वजिराबाद |
| 17) तिरंगा चौक वजिराबाद | 18) बंदाघाट |
| 19) रेल्वेस्टेशन सिटीबस स्टॉप जवळ | 20) दयानंदनगर |

या सर्व शौचालयापैकी काही 20 व 10 वर्षासाठी निविदा पद्धतीने जागेचे भाडे घेऊन संस्था चालकांना बीओटी तत्वावर शौचालय बांधून चालवण्यासाठी देण्यात आलेली आहेत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत पन्नास हजार फिरती लोकसंख्या असल्यामुळे त्यांच्या सोयीसाठी व आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियानाद्वारे महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालये नागरिकांसाठी एकूण 522 टॉयलेट सिट्सची आवश्यकता आहे. त्यापैकी आजमितीस एकूण 214 टॉयलेट सिट्स उपलब्ध आहेत आणखी 308 टॉयलेट सिट्सचे बांधकाम करावयाचे असून त्यापैकी पुरूषांकरिता 120 टॉयलेट सिट्स व महिलांकरिता 188 टॉयलेट सिट्स बांधायचे आहेत.

तरी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची लोकसंख्या व फिरती लोकसंख्येचा विचार केला असता बीओटी तत्वावर मुख्य रस्त्याच्या बाजूस फूटपाथवर 25 ठिकाणी सार्वजनिक शौचालयासाठी जागा प्रस्तावित करून सदरील शौचालयास ड्रेनेज जोडणी व नळ जोडणी देऊ शकता येईल काय ? याचा अहवाल कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा व मलनि:सारण विभाग यांचे कडून घेतला असता त्यांनी खालील ठिकाणी नळ व ड्रेनेज जोडणी देऊ शकता येईल असा अहवाल दिला आहे.

1) नमस्कार चौक 2) बाफना टी पॉइंट
3) चिखलवाडी कॉर्नर 4) नगीणाघाट
5) गोवर्धनघाट 6) चैतन्यनगर महादेव मंदीर
7) भावसार चौक तरोडा खु. 8) दधीची मार्ग, शिवाजीनगर
9) गणेश नगर वाय पॉइंट 10) पाण्याची टाकी खडकपुरा
11) आनंदनगर चौक

तसेच शहरात विविध 8 ठिकाणी फक्त महिलांसाठी सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करणे प्रस्तावित आहेत.

1) वजिराबाद येथील बंजारा हॉटेलसमोर (पुर्वीची पडलेल्या पाण्याच्या टाकीची जागा )
2) आयुर्वेदिक कॉलेजच्या फुटपाथवर 3) आयटीआय ते स्नेहनगर फुटपाथवर
4) विद्यानगरच्या समोर फुटपाथवर 5)श्यामनगर दवाखाना जवळील फुटपाथवर
6) जुना मोंढा ते बर्की चौक 7) श्रीनगर पंचशील ड्रेसेसच्या बाजुला
8) घामोडीया फॅक्ट्री, डॉक्टर लेन, डॉ.मापारे यांच्या दवाखान्याच्या बाजुचे मोकळ्या जागेवर (open space)

वरील ठिकाणी बीओटी तत्वावर 20 वर्षासाठी सार्वजनिक शौचालये दैनिक वृत्तपत्रात जाहीर सुचना प्रसिद्ध करून मा. आयुक्त हे ठरवितील त्या नियम व अटीप्रमाणे भाडेपट्टीवर संस्था चालकांना देणेसाठी शहरातील जागेच्या आवश्यकतेनुसार बीओटी तत्वावर सार्वजनिक शौचालय महानगरपालिका हद्दीत बांधून चालवण्यास मान्यता देण्याचा अधिकार मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना देणेचा प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**महापौर** हडको रविवार बाजार, व लातूर रस्त्यावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, शेतकी विद्यालय पावडेवाडी नाका परिसरात वर्कशॉप, बंदाघाट या ठिकाणाचा प्रस्तावात समावेश करुन दुरुस्तीसह आयुक्तांचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१०४** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत पन्नास हजार फिरती लोकसंख्या असल्यामुळे त्यांच्या सोयीसाठी व आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियानाद्वारे महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालये नागरिकांसाठी एकूण 522 टॉयलेट सिट्सची आवश्यकता आहे. त्यापैकी आजमितीस एकूण 214 टॉयलेट सिट्स उपलब्ध आहेत आणखी 308 टॉयलेट सिट्सचे बांधकाम करावयाचे असून त्यापैकी पुरूषांकरिता 120 टॉयलेट सिट्स व महिलांकरिता 188 टॉयलेट सिट्स बांधायचे आहेत.

करीता कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा व मलनि:सारण विभाग यांनी खालील निश्चित केलल्या जागेवर बांधकाम करण्यात येणा-या र्साजनिक शौचालयास ड्रेनेज जोडणी व नळ जोडणी देऊ शकता येईल असा अहवाल दिलेला असल्यामूळे खालील मुख्य रस्त्याच्या बाजूस फूटपाथवर बीओटी तत्वावर 20 वर्षासाठी सार्वजनिक शौचालये दैनिक वृत्तपत्रात जाहीर सुचना प्रसिद्ध करून महापौर, व आयुक्त हे संयुक्तरित्या ठरवितील त्या नियम व अटीप्रमाणे भाडेपट्टीवर संस्था चालकांना देणेसाठी ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. तसेच शहरातील जागेच्या आवश्यकतेनुसार बीओटी तत्वावर सार्वजनिक शौचालय महानगरपालिका हद्दीत बांधून चालवण्यास मान्यता देण्याचा अधिकार महापौर व आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना ही नांवामनपा नांदेड सर्वानुमते देते, व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

1) नमस्कार चौक 2) बाफना टी पॉइंट
3) चिखलवाडी कॉर्नर 4) नगीणाघाट
5) गोवर्धनघाट 6) चैतन्यनगर महादेव मंदीर
7) भावसार चौक तरोडा खु. 8) शिवाजीनगर
9) गणेश नगर वाय पॉइंट 10) पाण्याची टाकी खडकपुरा
11) आनंदनगर चौक 12) बंदाघाट
13) वर्कशॉप पाण्याची टाकी

शहरात विविध ११ ठिकाणी फक्त महिलांसाठी सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करणे.

1) वजिराबाद येथील बंजारा हॉटेलसमोर (पुर्वीची पडलेल्या पाण्याच्या टाकीची जागा )
2) आयुर्वेदिक कॉलेजच्या फुटपाथवर 3) आयटीआय ते स्नेहनगर फुटपाथवर
4) विद्यानगरच्या समोर फुटपाथवर 5)श्यामनगर दवाखाना जवळील फुटपाथवर
6) जुना मोंढा ते बर्की चौक 7) श्रीनगर पंचशील ड्रेसेसच्या बाजुला
8) घामोडीया फॅक्ट्री, डॉक्टर लेन, डॉ.मापारे यांच्या दवाखान्याच्या बाजुचे मोकळ्या जागेवर (open space)
9) शेतकी महाविद्यालय पावडेवाडी नाका 10) हडको रविवार बाजार
11) लातूर फाटा

**विषय क्र.६** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरालिका २०१५-२०१६ करीता मालमत्ताधारकाना मालमत्ता कराचे मागणी बिल ई-गर्व्हनन्स व्दारे नव्याने अमलबजावणी करण्यात येत असल्याने मालमत्ताधारकाना मागणी बिल मिळण्यास वेळ लागला त्यामूळे मालमत्ता व पाणी करातील शास्ती माफ करण्यासंदर्भात चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.

**सुचक :-** शफि अहेमद कुरेशी **अनुमोदक :-** विरेंद्रसिंघ गाडीवाले

**महापौर** जे मालमत्ताधारक १० फेब्रूवारी २०१६ पुर्वी मागील मालमत्ता कर व पाणी पटी कराची थकबाकी भरतील त्याना ५० टक्के शास्तीत सुट देण्यास व तसेच सन २०१५.२०१६ चालू आर्थिक वर्षाचा या संपूर्ण मालमत्ता कराचा व पाणी पटी कराचा भरणा करतील त्यांना १०० टक्के मालमत्ता कराची पाणी पटी कराची शास्ती माफ करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१०५** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरालिका २०१५-२०१६ करीता मालमत्ताधारकाना मालमत्ता कराचे मागणी बिल ई-गर्व्हनन्स व्दारे नव्याने अमलबजावणी करण्यात येत असल्याने मालमत्ताधारकाना मागणी बिल मिळण्यास वेळ लागला त्यामूळे जे मालमत्ताधारक १० फेब्रूवारी २०१६ पुर्वी मागील मालमत्ता कर व पाणी पटी कराची थकबाकी भरतील त्याना ५० टक्के शास्तीत सुट देण्यास व तसेच सन २०१५.२०१६ चालू आर्थिक वर्षाचा यासंपुर्ण मालमत्ता कराचा व पाणी पटी कराचा भरणा करतील त्यांना १०० टक्के मालमत्ता कराची पाणी पटी कराची शास्ती माफ करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**<u>पुरवणी विषय पत्रिका</u>**

**<u>विषय क्र.१</u>**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनावर भर देण्यात आलेला असून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत सध्या ओला व सुका कच-याचे एकत्रित कलेक्शन करुन ते तुप्पा येथील डंपिंग ग्रावुंडवर साठवण्यात येत आहे. घन कचरा व्यवस्थापनासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा मागविणे अंतिम करण्याची कार्यवाही वेगवेगळेपनाने करण्यात येत आहे. ओला कचरा, भाजीपाला मार्केट येथील वेस्ट ,हॉटेलचे वेस्ट या सर्वावर प्रक्रिया करुन सेंद्रीय खत निर्माण करण्याचा पर्याय उपलबध्द असून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे प्रायोगिक तत्वावर भागीदारी तत्वावर यासाठी एक प्लॅन्ट उभारण्याचा मानस आहे. यासाठी निविदा मागविणे सर्वात कमी दराची निविदाधारकासोबत वाटाघाटी करुन प्रकल्प उभारण्यासाठी व सेंद्रीय खत निर्माण करणे, निर्माण झालैल्या सेंद्रीय खताची विक्री करणे यासाठी प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून सदरील कार्यवाही करण्यासाठी लागणा-या खर्चास १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून खर्च करण्याची व सर्व प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सादर.

**महापौर** घन कचरा व्यवस्थापन अंतर्गत ओला कचरा, भाजीपाला मार्केट येथील वेस्ट ,हॉटेलचे वेस्ट या सर्वावर प्रक्रिया करुन सेंद्रीय खत निर्माण करण्याचा प्रकल्प उभारण्यास तत्वतःमान्यता देण्यात येते.या प्रकल्पाचा सविस्तर डिपीआर करुन खर्चाचे अंदाजपत्रकासह प्रस्ताव सभेत ठेवण्यात यावा.हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१०६** **ठराव**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनावर भर देण्यात आलेला आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत सध्या ओला व सुका कच-याचे एकत्रित कलेक्शन करुन ते तुप्पा येथील डंपिंग ग्रावुंडवर साठवण्यात येत असून घन कचरा व्यवस्थापन अंतर्गत ओला कचरा, भाजीपाला मार्केट येथील वेस्ट, हॉटेलचे वेस्ट या सर्वावर प्रक्रिया करुन सेंद्रीय खत निर्माण करण्याचा प्रकल्प १४ व्या वित्त आयोगाचया निधीतून उभारण्यास तत्वतःमान्यता देण्यात येते. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) खर्चाचे अंदाजपत्रकासह तयार करुन त्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील श्री गोविंद पांडूरंग देशमूख, प्र.सहायक आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांना कार्यालयीन आदेश क्र.नावाशमनपा/यांत्रिकी व परि/६६२१५/१५ दि.२४.८.२०१५ अन्वये कार्यालयीन कामकाजासाठी स्वत:चे वाहन क्र.एमएच-२६/एके -०४०२ व एम.एच.२६ व्हि-२५५५ या वाहनाचा वापर केल्यामूळे वाहन भत्ता अदाई करणे बाबत सदरील आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे. करीता संबंधितांना दि.१.७.२०११ ते ३१.१.२०१५ या कालावधीत वापरलेल्या वाहनांचा वाहन भत्ता रक्कम रु.३,४३,२२६/-मंजुर करण्यात आलेला आहे. त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आथिक मान्यतेस्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**महापौर** आयुक्तांचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र.१०७** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील श्री गोविंद पांडूरंग देशमूख, प्र.सहायक आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांनी कार्यालयीन कामकाजासाठी दि.१.७.२०११ ते ३१.१.२०१५ या कालावधीत स्वत:चे वाहन क्र.एमएच-२६एके -०४०२ व एम.एच.२६ व्हि-२५५५ या वाहनाचा वापर केल्यामूळे त्यांना आदेश क्र.नावाशमनपा/यांत्रिकी व परि/६६२१५/१५ दि.२४.८.२०१५ अन्वये वाहन भत्ता देण्यास मान्यता देवून वाहन भत्ता रक्कम रु.३,४३,२२६/-मंजुर करण्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते तसेच या पुढे नांवामनपा सर्वसाधारण सभेची मान्यता अपेक्षीत धरुण कोणत्याही प्रकारची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येऊ नये अत्यावशक व तातडीचे कामासाठी मा.महापौरांची प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेऊन त्यास कार्यातर मान्यतेचा प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर ठेवण्यात यावा असे हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.३**

नावाशमनपा हद्दीत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत वैयक्तिक शौचालय नसलेल्या घरांचा घरांचा सर्व्हे करणे, प्रत्यक्ष स्थळ पाहणी व शौचालय बांधकामावर देखरेख ठेवणेसाठी मनपाकेचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांची नियुक्ती करण्यात आली आहे त्यांना या कामी शहरात अनेक ठिकाणी जावे लागते त्यामुळे कनिष्ठ अभियंता यांना प्रति महिना रु. ३,०००/- व उपअभियंता यांना प्रति महिना रुपये ६,०००/- वाहन भत्ता अनुज्ञेय करणेचे प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे सदरचा प्रस्ताव याच सभेत कायम करण्याची शिफारस आहे.

**महापौर** आयुक्तांचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१०८** **ठराव**

नावाशमनपा हद्दीत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत वैयक्तिक शौचालय नसलेल्या घरांचा घरांचा सर्व्हे करणे, प्रत्यक्ष स्थळ पाहणी व शौचालय बांधकामावर देखरेख ठेवणेसाठी मनपाकेचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांची नियुक्ती करण्यात आली आहे त्यांना या कामी शहरात अनेक ठिकाणी जावे लागते त्यामुळे कनिष्ठ अभियंता यांना प्रति महिना रु. ३,०००/- व उपअभियंता यांना प्रति महिना रुपये ६,०००/- वाहन भत्ता अनुज्ञेय करणेचे प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.४**

महाराष्ट्र शासन नगरविकासक विभाग शासन निर्णय क्रं. डिव्हीवाय १९१५/प्र.क्र.९५/नवि-४ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक ०७.०७.१५ अन्वये नागरी दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सालसन २०२५-१६ करिता रुपये १०,६०,७०,०००/- चे अनुदान वितरीत केले आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. विघयो १०२०००/१५९२/प्र.क्र. १८९/नवि-४ मुंबई ३२ दिनांक ५ मार्च २००२ अन्वये मार्गदर्शक तत्वे विहित केले आहेत.

त्यानुसार शासनाने वितरीत केलेल्या जिल्हानिहाय तरतुदी प्राप्त झाल्यानंतर जिल्हयातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधीचे वितरण निश्चित करण्यासाठी दि. ५ मार्च २००२ च्या शासन निर्णयान्वये पुढील प्रमाणे जिल्हास्तरीय समिती जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली नियुक्ती करण्यात येत आहे असु नमुद केले आहे समिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) | महानगरपालिकेतील नगररचना शाखाधिकारी | सदस्य |
| ३) | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| ४) | महानगरपालिकेचे आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी | विशेष निमंत्रीत |
| ५) | जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशानाचे अधिकारी | सदस्य सचिव |

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्रं. डिव्हीवाय २६१५/प्र.क्र. १६२/नवि-४ मुंबई-३२ दिनांक १२.०८.२०१५ अन्वये नागरी दलीत वस्ती सुधारणा योजना मार्गदर्शक तत्वाच्या दि. ५ मार्च २००२ च्या शासन निर्णयात सुधारणा करुन जिल्हयातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरण निश्चित करण्यासाठी खालील प्रमाणे सुधारणा केली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | संबंधीत जिल्हयाचे पालकमंत्री | अध्यक्ष |
| २) | संबंधीत जिल्हयाचे जिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| ३) | समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| ४) | महानगरपालिका आयुक्त | सदस्य |

शासन निर्णय दि. ०५ मार्च २००२ अन्वये मार्गदर्शक तत्वानुसार वेळोवेळी सर्व साधारण सभेने कामाची निवड व निश्चिती करुन ठराव पारीत केल्यानुसार प्रस्ताव मान्यतेस्तव मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे सादर करण्यात येतात.शासन निर्णय क्रं. विघयो/२०१४/प्र.क्र.९५/नवि-४ दिनांक ०८.०८.२०१४ अनवये नागरी दलीत वसती सुधारणा योजना सालसन २०१४-१५ करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस रुपये २६.०३ कोटी चा निधी मंजुर झाल्यानंतर सर्व साधारण सभेनेच ठराव क्रं. ८३ दिनांक १४.०८.२०१४ अन्वये कामाची निवड निश्चीती देण्यात आली होती.

करिता शासन निर्णय दि. ०५ मार्च २००२ च्या मार्गदर्शक तत्वानुसार व शासन निर्णय दिनांक ०७.०७.२०१५ नुसार सन २०१५-१६ साठी रुपये १०,६०,७०,०००/-चे अनुदान वितरीत केले आहे शासन निर्णयानुसार कामे होण्याच्या दृष्टीने मंजुर अनुदानाचे १ १/२ पट रक्कमेच्या कामाची निवड व निश्चीत करुन प्राधान्याक्रम ठरवुन देण्या बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**महापौर** आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन 2015-16 करिता दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून दलित वस्तीत काम हाती घेण्यासाठी स.सदस्यांनी केलेल्या मागणी नूसार व त्या त्या प्रभागातील कामाची तातडी निकड व आवश्यकता लक्षात घेता विविध प्रभागातील दलित वस्त्यात सार्वजनिक कामे निश्चितीकरुन व प्राधान्यक्रम ठरवून हाती घेण्यासाठी मान्यता देण्यात येते.हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.१०९** **ठराव**

शासन निर्णय दि. ०५ मार्च २००२ च्या मार्गदर्शक तत्वानुसार व शासन निर्णय दिनांक ०७.०७.२०१५ नुसार नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन २०१५-१६ साठी शासनाने रुपये १०,६०,७०,०००/-चे अनुदान वितरीत केले असून या अनुदानातून स.सदस्यांनी केलेल्या मागणी नूसार व त्या त्या प्रभागातील कामाची तातडी निकड व आवश्यकता लक्षात घेता खालील प्रभागातील

दलित वस्त्यात सार्वजनिक कामे निश्चितीकरुन व अनुक्रमांकानुसार प्राधान्यक्रम ठरवून हाती घेण्यासाठीची मान्यता हि नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**कामाचे नांव**

१) विकास नगर भागात हटकर यांचे घर ते सोनसळे यांचे घर व जवळेकर यांचे घर ते जेतवण बुध्द विहार येथे आरसीसी नाली व सिसि रोडचे बांधकाम करणे (रु. २३.०० लक्ष)

२) सप्तगिरी कॉलनी भागात आठवले यांचे घर ते न्यु चावरे यांचे घर येथे RCC नाली व सिसि रोडचे बांधकाम करणे (रु. ८.०० लक्ष)

३) विजयनगर पाटी ते बाबू सुर्यवंशी यांचे किराणा दुकानापर्यंत आरसीसी नाली व सिसि रोडचे बांधकाम करणे, / कांबळे सोपान यांचे घर ते सुर्वे यांचे घरापर्यंत आरसीसी नाली व सिसि रोडचे बांधकाम करणे (रु. ८.०० लक्ष)

४) सप्तगिरी कॉलनी भागात श्रृंगारपुतळेचे घर ते संकेत नगर पाटीपर्यंत आरसीसी नाली व सिसि रोडचे बांधकाम करणे (रु. ८.०० लक्ष)

५) नालंदानगर भरणे ते कायंदे यांचे घरापर्यंत सिसि रोड ( रु. ५.00 लक्ष )

६) नालंदानगर भरणे ते कायंदे यांचे घरापर्यंत आरसीसी नाली बांधकाम( रु. ५.00 लक्ष )

७) नालंदानगर रफीक यांचे घरापासून मेनरोडपर्यंत आरसीसी नाली ( रु. ५.00 लक्ष )

८) नालंदानगर येथे श्री. कांबळे यांचे घर ते श्री. आमपूरे,बापूनगर यांचे घरापर्यंत आरसीसी नाली बांधकाम(रु.५ लक्ष )

९) राहूलनगर भागात सिसि रोड बांधणे (रु. ५.00 लक्ष)

१०) पौर्णिमानगर भागात मारकवाड यांचे घर ते विठ्ठल निवासपर्यंत सिसि नाली बांधकाम व स्ट्रीट लाईट बसविणे (रु.८.00 लक्ष)

११) पांडुरंगनगर येथे जेएनएनयुआरएम अंतर्गत झालेल्या बांधकामावर 2 पूल बाधणे (रु. ८.०० लक्ष)

१२) विठ्ठल मंदिर ते कांबळे यांचे घरापर्यंत सिसि रोड तयार करणे (रु. ८.०० लक्ष)

१३) मुख्य रस्ता सांगवी पासून अण्णाभाऊ चौक ते माधव वाघमारे यांचे घरापर्यंत सिसिरोड तयारकरणे (रु.२०.०० लक्ष)

१४) पांडुरंग नाल्यालगत रस्ता तयार करणे (रु. ५.०० लक्ष)

१५) अण्णाभाऊ साठे समाज मंदिराचे कंपाऊंड (रु. ५.०० लक्ष)

१६) जवाहरनगर येथील रस्ता बांधकाम करणे (रु. १०.०० लक्ष)

१७) पौर्णिमानगर येथील रस्ता बांधकाम करणे (रु. ५.०० लक्ष)

१८) शामनगर ते हर्षनगर आरसीसी रोड बांधकाम करणे (रु. ५.०० लक्ष)

१९) राहूलनगर भागात संरक्षण भिंत बांधणे (रु. ८.०० लक्ष)

२०) पौर्णिमानगर हनुमान मंदिर, डोंगरे ते सोनवणे, श्रीधर कांबळे ते रुक्मीणी कुंज, जावळेकर ते वाटोरे, भिसे ते कदम आरसीसी नाली बांधकाम करणे (रु. २८.०० लक्ष )

२१) सम्राट अशोकनगर ते जंगमवाडी रोड मार्गे वर्कशॉप कॉर्नरपर्यंत रस्ता तयार करणे रुपये २०.०० लक्ष

२२) सन्मान कॉलनी पाटी पासून प्रा.वाघमारे यांचे घर ते डॉ.सोनकांबळे यांच्या घरापर्यंत डब्ल्युबीएम व CC रोड(रु.१८.०० लक्ष)

२३) तरोडा मुळ गाव दलित वस्तीमध्ये अंतर्गत रस्ते, नाल्या व स्मशानभुमीसाठी रस्ता व नाली करणे (रु.८.०० लक्ष)

२४) तरोडा खु.भागातील दलित वस्ती निधी अंतर्गत सामाजिक सभागृहाचे बांधकाम (रु. ८.०० लक्ष)

२५) सिध्दांत नगर भागात श्री. कवडे यांचे घरापासून ते श्री. मगरे यांचे घरापर्यंत व श्री. कवडे यांचे घरा पासून ते श्री. सोनकांबळे यांचे घरापर्यंत नाली व रस्ता तयार करणे तसेच भालेराव यांचे घरापासून ते श्री कांबळे यांचे घरापर्यंत व सन्मान कॉलनी भागातील श्री. वाघमारे यांचे घरापासून ते श्री. सोनकांबळे यांचे घरापर्यंत आरसीसी नालीचे बांधकाम करणे (रु. १८.०० लक्ष )

२६) तरोडा खु. मधील सुमेधनगर येथील कंपाऊंड वॉल बांधून सुशोभिकरण करणे (रु. १३.०० लक्ष)

२७) समता नगर भागात भंडारी नगर मुख्य रस्ता ते कांबळे यांचे घरापर्यंत आरसीसी रस्ता बांधकाम करणे (रु.२५.००लक्ष

२८) प्रभात नगर भागात विविध ठिकाणी आरसीसी नाली बांधकाम करणे (रु. १५.०० लक्ष )

२९) फायर स्टेशन पाठीमागे 30X100 फूटाचे आबेडकर स्मारक सुशोभिकरण करणे (रु. ५.०० लक्ष)

३०) श्री. कल्याणकर यांचे घर ते श्री. पटेल यांचे घरापर्यंत सिसि रोड बांधकाम करणे (रु. ५.०० लक्ष)

३१) श्री. खेडकर यांचे घरापासून ते वडेपल्ली यांचे घरापर्यंत सिसि रोड बांधकाम करणे (रु. ५.०० लक्ष)

३२) जिल्हाधिकारी निवास ते नवघडे यांच्या घरापर्यंत नविन ड्रेनेज लाईन व सीसी रोड करणे(रु. १०.०० लक्ष)

३३) मगनपुरा येथील झोपडपट्टी भागात मेनरोड बांधकाम करणे (रु. ८.०० लक्ष)

३४) मगनपुरा भागात अंतर्गत रस्ते बांधणे ( रु. ५.०० लक्ष )

३५) मगनपुरा भागात नालीचे काम करणे ( रु. ५.०० लक्ष )

३६) मगनपुरा झोपडपट्टी भागात समाजमंदिर बांधून स्ट्रीट लाईट पोलसह लावणे ( रु. ५.०० लक्ष )

३७) प्रभाग क्र. १२ मधील मुख्य रस्ता व अंतर्गत १० रस्त्यांचे बांधकाम ( रु. ३०.०० लक्ष )

३८) बालाजी नगर भागात सीसी नालीचे बांधकाम करणे (रु. १५.०० लक्ष )

३९) विठ्ठलनगर भागात ड्रेनेज लाईन टाकून रोड रिस्टोर करणे. (रु. २०.०० लक्ष)

४०) गोविंदनगर नाला ते आंबेकर किराणा दुकान शिवनगर रस्ता बांधकाम करणे रु. २०.०० लक्ष

४१) सखोजीनगर भागात मुख्य रस्त्याचे ठिकाणी मलनिस्सारण लाईन टाकणे रु. १५.०० लक्ष

४२) प्रभाग क्र. १४-अ मधील इश्वरनगर भागात रोड बांधकाम, करणे, गटार लाईन टाकणे, नाली बांधकाम व दिवाबत्ती व्यवस्थाकरणे. (रु. २० लक्ष) व हमालपूरा ते अण्णाभाऊ साठे चौकापर्यंत बॉक्स नालीचे बांधकाम (रु. १० लक्ष)

४३) रमामाता आंबेडकरनगर ते गोकुळनगर चौक ते रोड क्रमांक 26 पर्यंतचा रस्ता व नाली,तसेच मुलभूत सुविधा सहित रु. ६० लक्ष

४४) आंबेडकर नगर पाटीपासून ते चंपत रोकडे यांचे घरापर्यंत सिसि रोड व नाली बांधणे रु. ५.०० लक्ष

४५) श्री. कसबे गुरुजी ते श्रीकांत यांच्या घरापर्यंत सिसि रोड व नाली बांधणे ( रु. ५.०० लक्ष )

४६) श्री. वावडे गुत्तेदार यांचे घरापासून ते सुनिल किराणापर्यंत सिसि रोड व नाली बांधणे रु. ५.०० लक्ष

४७) श्री. गायकवाड यांचे घर ते श्री. येडके यांचे घरापर्यंत सिसि रोड व नाली बांधणे (रु. ५.०० लक्ष )

४८) आंबेडकरनगर येथील धोबीगल्लीत सिसिरोड बांधणे (रु. ५.०० लक्ष )

४९) राजनगर भागात मुख्य रस्ता ते कापसीकर यांचे घरापर्यंत सिसि रोड तयार करणे रु. ८.०० लक्ष

५०) राजनगर भागात व्ही.एस.पांडव यांचे घर ते दयानंद कोंडूसिंग जाधव यांचे घरापर्यंत सिसि रोड तयार करणे (रु.५.०० लक्ष

५१) राजनगर, नागसेननगर, चंद्रगुप्तनगर, क्रांतीनगर व रमाबाई सोसायटी भागातील विद्युत पोलवर नविन मर्क्युरी लाईट सेट बसविणे. ( रु. ५.०० लक्ष )

५२) गंगाराम कसबे ते मालोजी यांच्या घरापर्यंत पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे (रु. ८.०० लक्ष)

५३) भरत तुळसे ते प्रकाश नरवाडे यांचे घरापर्यंत पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे (रु. १०.०० लक्ष)

५४) भाउराव भदरगे ते कोंडीबा गोटमुखे यांचे घरापर्यंत पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे रु.१०.०० लक्ष

५५) भाउराव भदरगे ते कोंडीबा गोटमुखे यांचे घरापर्यंत सीसी रोड करणे (रु. १०.०० लक्ष)

५६) श्री. व्यवहारे यांचे घर ते श्री. जब्बार यांचे घरापर्यंत रस्ता व नाली बांधकाम करणे (रु.५.०० लक्ष)

५७) पंचशीलनगर भागामध्ये शोभा हटकर यांचे घरापासून ते बबन बंड यांचे घरापर्यंत सिसि रोड व नाली बांधकाम करणे (रु. १०.०० लक्ष )

५८) पंचशिलनगर भागात वायफळ यांचे घरापासून दिलीप भोळे यांचे घरापर्यंत सिसि नाली बांधकाम करणे ( रु. १०.०० लक्ष)

५९) पंचशीलनगर भागामध्ये शोभा हटकर यांचे घरापासून ते बबन बंड यांचे घरापर्यंत सिसि रोड व नाली बांधकाम करणे (रु.१०.०० लक्ष )

६०) पंचशीलनगर भागात सुविधा जसे, नाल्या, सिमेंड रोड ( रु.१५.०० लक्ष )

६१) प्र क्र.20 मधील त्रिपीठ बुध्दविहार, भैयासाहेब आंबेडकरनगर येथे बुध्द विहारास कंपाऊंड वॉल बांधणे रु.३५.०० लक्ष

६२) मिल क्लब चौरस्ता ते पोलिस हेड क्वॉर्टरची कंपाऊंड भिंत (भिमघाट) रोड येथे सिसि रोड करणे (रु. १५.०० लक्ष

६३) प्रभाग क्र. २२ मधील वडारवाडा व भोई गल्ली भागात ड्रेनेज लाईन टाकणे व सिसि रोड तयार रु. २०.०० लक्ष

६४) प्रभाग क्र. २३ मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. रु. २०.०० लक्ष

६५) भावेश्वरनगर भागात रस्ते व नाली बांधकाम करणे (रु. ३०.०० लक्ष )

६६) विठ्ठलनगर भागात प्रस्तावित ड्रेनेज लाईनमुळे नादुरुस्त होणारा रस्ता करणे (रु. १०.०० लक्ष )

६७) लिंबोणीनगर भागात स्लॅबसह आरसीसी नाली बांधकाम करणे (रु. १५.०० लक्ष )

६८) संघसेन नगर समाज मंदिर पासून बकरा मार्केट रोड पर्यंत सिसि रोड आणि नालीचे बांधकाम करणे(रु.५.०० लक्ष)

६९) शांतीनगर मुसाभाई यांच्या घरासमोर सिसि रोडचे बांधकाम करणे (रु.५.०० लक्ष )

७०) संघसेन नगर भागात बुध्दविहार ते मटन शॉप डी पी क्र. ११८ पर्यंत आरसीसी नालीसह स्लॅब टाकणे (रु. ५.०० लक्ष)

७१) संघसेन नगर भागात गल्ली क्र. १०२ ते किशोर अटकोरे ते नारायण गायकवाड यांच्या घरापर्यंत दोन्ही बाजूस आरसीसी नालीसह स्लॅब बांधणे ( रु. ५.०० लक्ष )

७२) पंचशिल नगरमध्ये रोड व नालीचे बांधकाम करणे

७३) पंचशिल नगरमध्ये समाज मंदिर बांधणे

७४) लिंबोणीनगर मध्ये समाज मंदिराचे कंपाऊंड वॉल बांधणे व पेवर्स बसविणे अ.क्र. ७२ ते ७४ तिन्ही कामासाठी रु. २०.०० लक्ष )

७५) प्रितीनगर भागात नाली व रस्ता बांधकाम करणे रुपये १०.०० लक्ष

७६) प्रभाग क्र. ३०-अ मधील पहेलवान टी हाऊसच्या बाजूच्या गल्लीत रस्ते व नाली काम रु. १०.०० लक्ष

७७) प्रभाग क्र. ३०-अ तकीया चौफाळा येथे रस्ते व नाली बांधकाम करणे रु. १०.०० लक्ष

७८) सिध्दार्थ नगरमध्ये नविन पाणी पुरवठा व ड्रेनेज लाईन टाकणे रु. २०.०० लक्ष

७९) धनगरटेकडी भागातील दलित वस्ती असलेल्या श्री. साखरे यांच्या घरापासून ते श्री. शेवडकर यांच्या घरापर्यंत सिसि रोड व ड्रेनेज लाईन रु १०.०० लक्ष

८०) गौतम नगर ते रंग्या यांचे किराणा दुकानापर्यंत सिसिरोड बांधणे (रु. १५.०० लक्ष)

८१) एकतानगर येथील सुर्यकांत सावळे यांच्या घरापासून सखाराम वाघमारे यांचे घरापर्यंत आरसीसी नाली व सीसीरोड करणे (रु. ८.०० लक्ष

८२) हारीचंद्र मोळके यांचे घरापासून शिवाजी भुरे, नामदेव सुर्यवंशी मार्गे वसरणी मेनरोडपर्यंत आरसीसी नाली व सीसी रस्ता करणे (रु. ८.०० लक्ष )

८३) निवृत्ती पोवळे यांचे घरापासून महात्मा फुले चौका पर्यंत आरसीसी नाली व रस्ता करणे ( रु. ८.०० लक्ष )

८४) मारोती वंजारे यांचे घर ते महात्मा फुले चौकापर्यंत डांबरी रस्ता करणे (रु. ८.०० लक्ष)

८५) प्रभाग क्र. 36– अ भिमवाडी दलित वस्तीमध्ये सिमेंट नाली बांधकाम इ. (रु. १०.०० लक्ष)

८६) भास्करेनगर बुध्द मुर्ती परिसरास कंपाऊंड वॉल व सिसि प्लॅटफॉर्म तयार करणे. (रु. १०.०० लक्ष)

८७) वसरणी येथील सुजाता बौध्द विहार सभागृहाचे विस्तारित काम करणे व रहीमपुर येथील बौध्द विहाराच्या जागेला संरक्षक भिंत बांधणे (रु. १०.०० लक्ष)

८८) नविन कौठा येथील मारोती घोंगडे यांचे घर ते नितीन जोंधळे यांचे घरापर्यंत सिसि रोड व नाली बांधकाम करणे रु. (१०.०० लक्ष)

८९) जुना कौठा येथील पाण्याच्या टाकी पासुन बनाजी बारसे यांच्या घरासमोरुन ते बौध्दविहाराकडे जाणारा सी.सी. रोड करणे. (अंदाजे रु. १०.०० लक्ष)

९०) नविन कौठा येथील बौध्द विहारापासून ते जबीभाई यांचे घरापर्यंत सिसि रोड बाधकाम करणे (रु. १०.०० लक्ष)

९१) नागलोक बुध्द विहार येथील संरक्षण भिंत बांधणे (रु. २८.०० लक्ष)

९२) इंदिरा गांधी महाविद्यालय ते स्मशानभूमी पर्यंत आरसीसी नाली व सिसि रोड बांधणे (रु. ८.०० लक्ष)

९३) एनडी-१२० पुलापासून ते गायकवाड कोचिंग क्लासेस समोरील नाली व पुलाचे बांधकाम (रु. ४.०० लक्ष )

९४) एनडी४,के-१ जयभवानीनगर गोत्राम यांचे घरापासून जयराम जाधव यांचे घरापर्यंत सिसि रोड करणे (रु. ४.०० लक्ष )

९५) एनडी-४१, एफ सेक्टरमधील हनीफाबेगम शेख नजीर यांचे घरापासून लांडगे व झडते यांचे घरापर्यंत सिसि रोड बांधकाम करणे (रु. ४.०० लक्ष)

९६) सिडको, हडको के-१ व के-२ भागातील अंतर्गत सिसि रोड बांधकाम करणे (रु. १५.०० लक्ष)

९७) चंद्रमुनी बुध्द विहार पाटी ते स्मशानभुमीपर्यंत सिसिरोड बांधकाम करणे (रु. १५.०० लक्ष)

९८) वाघाळा येथील बौध्दवस्तीतील बुध्दविहारच्या प्रांगणात सिसि बेड कॉंक्रीट व अंतर्गत सिसि रस्ते व सिसि नाल्या (रु. ९.०० लक्ष

९९) वाघाळा बौध्द वस्तीतील विहाराच्या उजव्या बाजू पासून खंदारे घर, अशोक पंडीत बाजूचा रस्ता, श्री निखाते सिसिरोड दुतर्फा नालीसह (रु. ९.०० लक्ष)

१००) राहूलनगर माधव पटेकर यांचे घर ते ढवळे यांचे घरापर्यंत सिसि नाली बांधकाम (रु. ९.०० लक्ष)

१०१) मीरानगर लांगरीबाई यांचे घर ते चिंचेच्या झाडा समोरील वाघाळा बौध्द वस्तीपर्यंत सिसि रोड व नाली बांधकाम करणे (रु. ९.०० लक्ष )

१०२) राहूलनगर येथील कुशी नारा बुध्द विहाराच्या प्रांगणापासून ते श्री. कसबे यांचे घरापर्यंत सिसि रोड व दुतर्फा नाली (रु. ९.०० लक्ष)

१०३) त्रीरत्न बुध्दविहार आंबेडकर नगर येथील बुध्दीविहाराचे उर्वरीत बांधकाम करणे रु. २५.०० लक्ष

१०४) मनपा हद्दीत प्रभाग क्रं.४ मध्ये गांधीनगर भागात मलनिस्सारण लाईन टाकणे रु. २३,११,९००/-

१०५) मनपा हद्दीत प्रभाग क्रं. ३६ भिमवाडी भागात मलनिस्सारण लाईन टाकणे रु. ५०.०० लक्ष

१०६) प्रभाग क्रं. १ सप्तगीरी कॉलनी ते कल्याणनगरला जोडणा-या रस्त्याचे डांबरीकरण करणे रु. २५.०० लक्ष

१०७) प्रभाग क्रं. ३ शिवनेरीनगर येथील सिसि रोड तयार करणे रु. २०.०० लक्ष

१०८) प्रभाग क्रं. २३ शक्तीनगर भागात सिसि रोड व नालीचे बांधकाम करणे रु. २०.०० लक्ष

**विषय क्र. ५**

सन १९६८-६९ मध्ये डंकीन पेपिंग स्टेशनच्या कामासोबतच तेथुन वर्कशॉप जलकुंभ पर्यंत ६०० मी.मी. व्यासाची कास्ट आयर्न रायझींग मेन टाकण्यात आलेली आहे. ही लाईन शेतातुन चूनाल नाल्यामध्युन, उस्मानशाही हायस्कुल मैदानातून, पक्कीचाळ चौरस्ता, मील कंपाऊंड रोड, जेल कंपाऊंड, रेल्वेपटरी ओलांडुन अशी टाकलेली आहे.जेएनएनयुआरएम पुर्वी या रायझींग मेन वरून वर्कशॉप (२), गांधीपूतळा,रेल्वेस्टेशन(२), आंबेडकरनगर व खडकपुरा असे ७ जलकुंभ भरले जायचे.त्यानंतर ही लाईन पक्कीचाळ पासून पुढे बंद असुन यावर सध्या ४ जलकुंभ भरले जातात.डंकीन बाहेर पासून चुनाळ नाल्यापर्यंत ही लाईन शेतातुन टाकली आहे.येथे आता प्लॉटींग झाली आहे.त्यामुळे ही लाईन आता मार्ग बदलून रस्त्याच्या कडेने टाकणे (उर्वशी मंदिर जवळील पुलावरून, बॉम्बे चाळ, मार्कंडेय मंदिर मार्गे) गरजेचे आहे. जुनी लाईन काढुन पुन:टाकणे शक्य नाही, कारण त्यासाठी पाणी पुरवठा पूर्णपणे बंद ठेवावा लागतो. जेएनएनयुआरएम तरोडा पाणी पुरवठा योजना कामें प्रगतीपथावर आहेत. या योजनेवर ४५० मी.मी.ची.डी.आय.पाईप लांबी १५६० मिटर एवढे अतिरिक्त पाईप उपलबध्द आहेत हे पाईप उपरोक्त जुनी लाईन बदलून टाकण्यासाठी तांत्रिक दृष्या योग्य आहे.

वरील प्रमाणे जुनी लाईन बदलण्यासाठी व ४५० मी.मी.ची नविन पाईन लाईन रस्त्याच्या कडेने टाकण्याच्या कामासाठी म.न.पा.सभेची मान्यता मिळणेसाठी सादर.

**महापौर** प्रस्तावित कामाचे प्रस्तावास लागणा-या खर्चाच्या अंदाजपत्रकासह मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.११०** **ठराव**

सन १९६८-६९ मध्ये डंकीन पेपिंग स्टेशनच्या कामासोबतच तेथुन वर्कशॉप जलकुंभ पर्यंत ६०० मी.मी. व्यासाची कास्ट आयर्न रायझींग मेन टाकण्यात आलेली आहे. ही लाईन शेतातुन, चूनाळ नाल्या मधून, उस्मानशाही हायस्कुल मैदानातून, पक्कीचाळ चौरस्ता, मील कंपाऊंड रोड, जेल कंपाऊंड, रेल्वेपटरी ओलांडुन वर्कशॉप जलकुंभापर्यंत अशी आहे.

जेएनएनयुआरएम योजनेपुर्वी या रायझींग मेन वरून वर्कशॉप (२), गांधीपूतळा,(१), रेल्वेस्टेशन(२),आंबेडकरनगर (१) व खडकपुरा(१), असे ७ जलकुंभ भरले जायचे.त्यानंतर ही लाईन पक्कीचाळ पासून पुढे बंद करुन सध्या यालाईनव्दारे ४ जलकुंभ भरले जातात.

डंकीन बाहेर पासून चुनाळ नाल्यापर्यंत ही लाईन शेतातुन टाकली आहे.येथे आता प्लॉटींग झाली आहे.त्यामुळे ही लाईन आता मार्ग बदलून रस्त्याच्या कडेने टाकणे(उर्वशी मंदिर जवळील पुलावरून,बॉम्बे चाळ, मार्कंडेय मंदिर मार्गे) गरजेचे आहे. जुनी लाईन काढुन पुन:टाकणे शक्य नाही,कारण त्यासाठी पाणी पुरवठा पूर्णपणे बंद ठेवावा लागतो.

जेएनएनयुआरएम तरोडा पाणी पुरवठा योजनेतील कामें प्रगतीपथावर असून या योजनेतील ४५० मी.मी.ची.डी.आय.पाईप उपलब्ध्द आहे. करीता आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार सदर ४५० मी.मी.ची नविन पाईन लाईन लांबी अंदाजे १६०० मिटर (नग २६० पाईप) एवढी डंकिन ते पक्कीचाळ पर्यत रस्त्याच्या कडेने टाकण्याच्या कामासाठी लेबर लेईंग चार्जेस अंदाजपत्रकीय रक्कम रु.२२.५० लक्षच्या (अक्षरी रु.बाविस लक्ष पन्नास हजार फक्त) किंमतीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते, व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.६** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे प्रमुख उत्पन्न स्त्रोत असलेला स्थानिक संस्था कर रध्द झाल्यामुळे महापालीकेचा आर्थिक परिस्थितीवर होणारे परिणाम व त्यावर मात करण्यासाठी भविष्यकाळासाठी प्रशासनतर्फे आखण्यात आलेले नियोजनाची माहीती व त्यावर उपाययोजना सुचविण्याबाबत चर्चा करणे

**सुचक** :- विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

**<u>प्रशासकी टिप्पणी</u>**

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगांने अहवाल सादर करण्यात येतो की, नांवामनपा प्रमुख उत्पन्नाचे स्त्रोत स्थानिक संस्था कर रध्द झाल्यामूळे महानगरपालिकेचा आर्थिक परिस्थतीवर व त्यावर मात करण्यासाठी महानगरपालिकेने तज्ञ सल्लागार समिती नियुक्ती करणे बाबत सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे त्यानुसार तज्ञ सल्लागार समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येईल.

**महापौर** महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढीसाठी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली असून तज्ञ सलागाराचा अहवाल आल्यानंतर तो सर्वसाधारण सभेत निर्णयासाठी ठेवण्यात येईल.

**ठराव क्र.१११** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे प्रमुख उत्पन्न स्त्रोत असलेला स्थानिक संस्था कर रध्द झाल्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीवर होणारे परिणाम व त्यावर मात करण्यासाठी उत्पन्न वाढीचे पर्याय शोधण्यासाठी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आलेली असून तज्ञ सलागाराचा अहवाल आल्यानंतर तो सर्वसाधारण सभेत निर्णयासाठी ठेवण्यात यावा असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा संमत करते.

**विषय क्र.७** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत व स्थानिक संस्था कर थकबाकी व असीसमेंट व्दारे मिळणारे उत्पन्न बाबत.

**सुचक** :- अ.सत्तार अ.गफूर **अनुमोदक** :- अ.लतीफ अ. मजीद

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने स्थानिक संस्था करा बाबत खालील प्रमाणे प्रशासकीय अभिप्राय देण्यात येत आहे.

| | अभय योजनेमध्ये लाभ न धेतलेले सन २०१०.२०११ ते आज पर्यत एकूण संचिकाची संख्या | अभय योजनेमध्ये लाभ न धेतलेले सन २०१०.२०११ ते आज पर्यत एकूण संचिकेची अपेक्षित उत्पन्न | अभय योजने अंतर्गत प्राप्तझालेल्या संचिकेची संख्या | अभययोजने अंतर्गत कर निर्धारण | अभययोजने अंतर्गत करनिर्धारणा पासून मिळणारे उत्पन्न | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | स्थासंकर | व्याज | एकूण | ७+8 |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| **एकूण** | १७०७४ | ८५३७०००० | ५६३३ | १७१ | ४८९८५४ | २६४९१५८ | १८८३२८ | २८३७४८६ |

१) स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ अंतर्गत एकूण संचिका ५६३३ प्राप्त झालेल्या आहेत व त्या संचिकेमधून १७१ संचिकेंचे कर निर्धारण झालेले आहे. उर्वरीत संचिका ५४६२ कर निर्धारण करणे प्रगतीपथावर आहे. व त्यापासून मिळणारे उत्पन्न रु.१,५६,४३,१६८/-अपेक्षित आहे.

२) अभय योजना २०१५ अंतर्गत लाभ न घेतलेल्या एकूण संचिका १७०७४ असून त्यामधून महानगरपालिकेस व्याज व दंडापासून जास्तीचे उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. सदर योजने मध्ये लाभ न घेतलेल्या व्यापा-याकडून व्याज व दंड मिळण्याची शक्यता आहे. परंतु अभय योजनेचा लाभ न घेतलेल्या व्यापारी प्रतिष्ठानावर काय कार्यवाही करावी याबाबतचे स्पष्ट निर्देष अद्याप पर्यत प्राप्त झालेले नाहीत,अशा एकूण संचिका १७०७४ व त्यापासून उत्पन्न रु.८,५३,७०,०००/- अपेक्षित आहे.

१) एकूण कर निर्धारण संचिका (अभय योजना) ५४६२ X २८६४ = १,५६,४३,१६८/-

२) अभय योजने अंतर्गत लाभ न घेतलेल्या सचिका १७०७४ X ५००० = ८,५३,७०,०००/-

१०,१०,१३,१६८/-

**महापौर** प्रस्तावाचे अनुषंगाने देण्यात आलेल्या माहितीची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र.११२** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत व स्थानिक संस्था कर थकबाकी व असीसमेंट व्दारे मिळणारे उत्पन्न बाबत खालील प्रमाणे माहिती देण्यात आली त्यांची नोंद हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानूमते घेते.

| | अभय योजनेमध्ये लाभ न घेतलेले सन २०१०.२०११ ते आज पर्यत एकूण संचिकाची संख्या | अभय योजनेमध्ये लाभ न धेतलेले सन २०१०.२०११ ते आज पर्यत एकूण संचिकेची अपेक्षित उत्पन्न | अभय योजने अंतर्गत प्राप्तझालेल्या संचिकेची संख्या | अभययोजने अंतर्गत कर निर्धारण | अभययोजने अंतर्गत करनिर्धारणा पासून मिळणारे उत्पन्न | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | स्थासंकर | व्याज | एकूण | ७+8 |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| **एकूण** | १७०७४ | ८५३७०००० | ५६३३ | १७१ | ४८९८५४ | २६४९१५८ | १८८३२८ | २८३७४८६ |

१) स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ अंतर्गत एकूण संचिका ५६३३ प्राप्त झालेल्या आहेत व त्या संचिकेमधून १७१ संचिकेंचे कर निर्धारण झालेले आहे. उर्वरीत संचिका ५४६२ कर निर्धारण करणे प्रगतीपथावर आहे. व त्यापासून मिळणारे उत्पन्न रु.१,५६,४३,१६८/-अपेक्षित आहे.

२) अभय योजना २०१५ अंतर्गत लाभ न घेतलेल्या एकूण संचिका १७०७४ असून त्यामधून महानगरपालिकेस व्याज व दंडापासून जास्तीचे उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. सदर योजने मध्ये लाभ न घेतलेल्या व्यापा-याकडून व्याज व दंड मिळण्याची शक्यता आहे. परंतु अभय योजनेचा लाभ न घेतलेल्या व्यापारी प्रतिष्ठानावर काय कार्यवाही करावी याबाबतचे स्पष्ट निर्देष अद्याप पर्यत प्राप्त झालेले नाहीत,अशा एकूण संचिका १७०७४ व त्यापासून उत्पन्न रु.८,५३,७०,०००/- अपेक्षित आहे.

१) एकूण कर निर्धारण संचिका (अभय योजना) ५४६२ X २८६४ = १,५६,४३,१६८/-

२) अभय योजने अंतर्गत लाभ न घेतलेल्या सचिका १७०७४ X ५००० = ८,५३,७०,०००/-

**विषय क्र. ८** **प्रस्ताव**

नावाशमनपा हद्दीतील बि.एस.यु.पी.अंतर्गत ब्रम्हपुरी भागातील घरकूल व मुलभुत सोई-सुविधा पुर्ण करण्याची चर्चा करणे.

**सुचक** :- अ.सत्तार अ.गफूर **अनुमोदक** :- अ.लतीफ अ. मजीद

**प्रशासकीय अभिप्राय**

केंद्र शासन पुरस्कृत बिएसयुपी योजने अंतर्गत न्यु. ब्रम्हपूरी येथील कामास DPR-11 अन्वये दिनांक: 20.03.2012 रोजी केंद्र शासनाकडुन मान्यता प्राप्त झाली त्यानुसार सदरील दिनांक:28.10.2012 रोजी मे. पंधे इन्फ्राकॉन्स, प्रा. लि. सोलापूर कंत्राटदार यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले त्याचा तपशील खालील प्रमाणे.

**मंजुर घरकुले** 1678
**रेखाकंन दिलेले घरकुले** 1081
**काम पूर्ण घरकुले** 663
**प्रगतीत असलेले घरकुले** 418

**कंत्राटदार निहाय केलेल्या घरकुलाचा तपशील:**

| अनु क्र | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटदारास वाटप केलेल्या घरकुलांची संख्या | रेखाकंन दिलेल्या घरकुलांची संख्या | पूर्ण झालेल्या घरकुलांची संख्या | प्रगतीत असलेल्या घरकुलांचा तपशिल | | | | एकुण प्रगतीत (6+7+8+9) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | टप्पा 1 | टप्पा 2 | टप्पा 3 | टप्पा 4 | |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** |
| 1 | पंधे इन्फ्रा प्रा.लि. | 802 | 686 | 401 | 2 | 3 | 104 | 176 | 285 |
| 2 | बि.जी. भास्करे कं. | 150 | 65 | 57 | 0 | 0 | 6 | 2 | 8 |
| 3 | बिल्डवेल कं. | 150 | 64 | 62 | 0 | 0 | 0 | 2 | 2 |
| 4 | फरहद देशमुख | 100 | 45 | 1 | 8 | 4 | 32 | 0 | 44 |
| 5 | पृथ्वी कं. | 85 | 17 | 0 | 2 | 0 | 15 | 0 | 17 |
| 6 | सन्मान कं. | 50 | 31 | 22 | 0 | 0 | 9 | 0 | 9 |
| 7 | श्रध्दा कं. | 85 | 39 | 0 | 14 | 5 | 20 | 0 | 39 |
| 9 | स्पार्क | 150 | 74 | 70 | 0 | 1 | 1 | 2 | 4 |
| 10 | स्वान, इन्फ्रा. | 85 | 39 | 32 | 1 | 4 | 2 | 0 | 7 |
| 11 | स्वता: लाभार्थी | 21 | 21 | 18 | 0 | 0 | 1 | 2 | 3 |
| **एकुण** | | **1678** | **1081** | **663** | **27** | **17** | **190** | **184** | **418** |

<u>1678 पैकी उर्वरीत घरकुले 597 चा तपशील</u>

1) 322 लाभार्थी घरकुल घेण्यास ईच्छुक नाहीत.
2) 154 वक्फ बोर्डच्या मालकी जागेमुळे त्यांचा आक्षेप आहे.
3) 121 मुळ लाभार्थी जागेवर उपलब्ध होत नाहीत.

<u>घरकुले व मुलभूत सुविधांच्या अर्थिक व भौतिक तपशील:</u>

| अनु क्र. | विवरण | निविदा प्रमाणे प्रस्तावित लांबी (मीटर मध्ये) | प्रत्यक्ष क्षेत्रावर झालेले काम (मीटर मध्ये) | शिल्लक काम (मीटर मध्ये) | कामावर झालेला खर्च (कोटी) | उर्वरित कामाचीकिंमत (कोटी) | झालेल्या कामाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 7 | 8 | 6 |
| 1 | घरकुले | 1678/ (1081) रेखांकने | 663 | 418 | 29.64 | 11.22 | 61% |
| 2 | पाणी पुरवठा वाहीनी | 15150.85 | 13152.65 | 1998.20 | 3.44 | 0.68 | 87% |
| 3 | मलनिस्सारण वाहीनी | 15622.40 | 11235.90 | 4386.46 | 2.11 | 1.67 | 72% |
| 4 | स्ट्रॉम वॉटर ड्रेन | 24158.18 | 7960.05 | 16198.10 | 1.44 | 3.27 | 32.95% |
| 5 | सिमेंट रस्ता | 14676.40 | 2584.35 | 12965.18 | 0.89 | 7.07 | 18% |
| 6 | स्ट्रिट लाईट | 540 | 145 | 395 | 0.53 | 1.79 | 27% |
| | | | | **एकुण** | **38.05** | **25.70** | **50% सरासरी** |

घरकुले व मुलभूत सुविधा पूरविणे या कामावर आतापर्यंत 38.05 कोटी एवढा खर्च झाला असुन रु.25.70 कोटी एवढया रक्कमेची कामे शिल्लक आहेत. यामध्ये फक्त 1081 घरकुलांची कामे करण्याचे सध्या पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

केंद्रीय मंजुरी व सहनियंत्रण समिति (CS & MC) यांच्या दि.20.03.2012 रोजीच्या बैठकीतील प्रकल्प मंजुरीच्या निर्देशानुसार घरकुले व मुलभूत सुविधा यांचे खर्चाचे प्रमाण 65:35 असावे असे निर्देश आहेत. त्यानुसार 1081 घरकुले पूर्ण करण्यासाठी रु.11.22 कोटी इतकी अंदाजीत रक्कम अपेक्षित आहे व मुलभूत सुविधावर रु.14.30 कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. सद्यास्थितीत घरकुल बांधकामावर 29.64 कोटी व मुलभूत सुविधा कामावर 8.42 कोटी एवढा खर्च झालेला आहे. शिल्लक घरकुलाचे बांधकाम व **रु.11.22 कोटी** व 65:35 गुणोत्तरा नुसार **रु.5.88 कोटी** रक्कमेच्या मुलभूत सुविधाची कामे करणे शिल्लक आहेत. सदरील प्रकल्पाची निविदा मंजुरीची किंमत रु.94.32 कोटी असुन आतापर्यंत शासनाकडुन रु.44.07 कोटी निधी प्राप्त झाला आहे, त्यापैकी रु.39.12 कोटी निधी खर्च झाला आहे. ज्यामध्ये रु.41.91 लक्ष मोबीलायझेशन अडव्हॉंसचा समावेश आहे.

**प्रकल्पाच्या विलंबाची कारणे पुढील प्रमाणे आहेत.**

1) लाभार्थ्यांकडुन घरकुल बांधकामासाठीचे कागदपत्रे मुदतीत उपलब्ध झाले नाहीत.
2) कंत्राटदाराकडुन घरकुलांची कामे प्रलंबित होत असल्याने दुसरे लाभार्थ्यांनी कच्च्या घराचे बांधकाम काढण्यास विलंब केला.
3) नविन ब्रम्हपुरी हा भाग काळया मातीचा असल्याने पावसाळ्याच्या दिवसात नविन रेखांकन देणेस उशीर झाला.
4) प्रकल्प वसाहतीमधील अरुंद रस्त्यामुळे बांधकाम साहित्य नेण्यास काही अंशी अडचणी उद्भवल्या.
5) कंत्राटदाराची कामाची गती कमी प्रमाणात असल्यामुळे.

**प्रकल्प पुर्ण करणेसाठी खालील प्रमाणे प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक बाबी.**

1) डोअर लॉक घरकुलांचे यादीस मंजुरी (193 घरकुले).
2) मुळ यादीतील लाभार्थ्यांचे नावामध्ये झालेला बदल झाल्यामुळे दुरुस्तीस मंजुरी (58)
3) मुळ यादीतील लाभार्थ्यांच्या नावाऐवजी अन्य लाभार्थ्यांच्या नावाने प्रत्यक्ष क्षेत्रावर 27 घरकुलाचे बांधकाम करणे.

सदरील भागातील मुळ कंत्राटदाराची कामाची गती कमी असल्याने त्यांच्या निविदा कामाचा वाव कमी करुन सदर घरकुलाची कामे अन्य नविन आठ कंत्राटदारा मार्फत करण्यात येत आहेत. तसेच मुलभूत सुविधेची कामे पूर्ण करण्यासाठी कंत्राटदारास वारंवार सुचना दिलेल्या आहेत व लेखी नोटीस ही दिलेली आहे त्यास कंत्राटदारा कडुन प्रतिसाद मिळत नव्हता सद्यस्थितीत मुलभूत सुविधेची व घरकुलाचे कामे बंद आहेत. त्यामुळे कंत्राटदारास आतापर्यंत रु.40.78 लक्ष दंड आकारण्यात आला आहे. कंत्राटदारास अर्धवट अवस्थेतील कामे त्वरीत सुरु करणे बाबत नोटीस दिली आहे. सदरील अर्धवट कामे मार्च 2016 अखेर पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे. मुळ कंत्राटदाराने कामे सुरु करुन पूर्ण न केल्यास निविदा अटी व शर्ती नुसार कारवाई करण्यात येईल.

**महापौर** प्रस्तावाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या माहितीची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र.११३** **ठराव**

नावाशमनपा हद्दीतील बि.एस.यु.पी.योजने अंतर्गत ब्रम्हपुरी भागातील घरकूल व मुलभुत सोई-सुविधा बाबत करण्यात आलेल्या कामाची व केलेल्या कार्यवाहीबाबत देण्यात आलेल्या सविस्तर महितीची नोंद ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**विषय क्र. ९** **प्रस्ताव**

लालवाडी येथील रेल्वे रूंदीकरणा मध्ये उठवण्यात आले असुन १) बाळु तुकाराम वाघमारे रा लालवाडी २) निर्मला गौतम वाघमारे रा लालवाडी यांच्या पुर्णवसण करण्यासाठी SITE No -34 मध्ये घरकुल देण्या करीता ही मनपा सर्व साधारण सभा सर्वानुमते समंत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- बाळासाहेब देशमुख **अनुमोदक** :- अंजलीबाई गायकवाड

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.११४** **ठराव**

लालवाडी येथील रेल्वे रूंदीकरणा मध्ये उठवण्यात आले असुन १) बाळु तुकाराम वाघमारे रा लालवाडी २) निर्मला गौतम वाघमारे रा लालवाडी यांच्या पुर्णवसण करण्यासाठी SITE No -34 मध्ये घरकुल देण्या करीता ही मनपा सर्व साधारण सभा सर्वानुमते समंत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र. १०** **प्रस्ताव**

लालवाडी येथील रहिवासी १) सुलक्षणा प्रकाश रोकडे २. क्रांती शामराव गीमेकर, ३. गंगासागर परमेश्वर प्रधानी यांची रेल्वे मार्ग रुंदीकरणामध्ये घरे गेलेली असून त्यांना साईट नं.३४ मध्ये घरकुल देण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

**सुचक** :- बाळासाहेब देशमुख **अनुमोदक** :- अंजलीबाई गायकवाड

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र.११५** **ठराव**

लालवाडी येथील रहिवासी १) सुलक्षणा प्रकाश रोकडे २. क्रांती शामराव गीमेकर, ३. गंगासागर परमेश्वर प्रधानी यांची रेल्वे मार्ग रुंदीकरणामध्ये घरे गेलेली असून त्यांना साईट नं.३४ मध्ये घरकुल देण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. ११** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत अटल शहरी पुर्नजीवन व परिवर्तन योजना कार्यान्वीत करण्या बाबत चर्चा करणे.

**सुचक**:- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक**:- आनंद चव्हाण

**महापौर** अमृत योजनेतील प्रस्तावित कामे जेएनएनयुआरएमच्या कामाचा पुढील टप्पा असून जेएनएनयुआरएम ची कामे ही नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेतर्फे झालेली आहेत म्हणून सर्व बाबी विचारात घेता,पुनरुज्जीवन आणि शहरी परिवर्तन अटलबिहारी अभियान(अमृत) अंतर्गत करावयाची प्रकल्पातील सर्व कामे शासनाच्या इतर विभागामार्फत न करता या प्रकल्पातील सर्व कामे जेएनएनयुआरएम व बिएसयुपी ,नगरोत्थान योजने प्रमाणेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमार्फत अमलबजावणी व कार्यान्वीत करण्याची मान्यता व्हावी अशी विनंती ही नांदेड वाघाळा शहर महागनपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते महाराष्ट्र शासनास करते.

**ठराव क्र.११६** **ठराव**

केंद्र शासनाने केंद्र शासनाच्या पुनरुज्जीवन आणि शहरी परिवर्तन अटलबिहारी अभियान ( अमृत) या योजनेत राज्यातील इतर शहरासह नांदेड शहराचाही समावेश केलेला आहे. त्यापैकी राज्यातील ड महानगरपालिकेकडे या योजनेतील प्रकल्पातील कामे करण्यासाठी पुरेसा अनुभव नाही व आवश्यक ते तांत्रिक अभियंते कर्मचारी सर्वासाधारणपणे रहात नाही त्यामूळे या योजनेतील प्रकल्पाची कामे शासनाच्या इतर विभागामार्फत करण्याचा शासन विचार करीत आहे.

परंतु नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकाही ड वर्ग असुनही या महानगरपालिकेने मागील ९ वर्षात केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान (जेएनएनयुआरएम), शहरी गरीबासाठी मूलभूत नागरी सुविधा प्रकल्पाची (बिएसयुपी),राज्य शासनाच्या नगरोत्थान योजनेची जवळपास खालील कामे आपल्या अधिनस्त असलेल्या तांत्रिक अधिकारी व कर्मचा-यामार्फत आपल्या स्तरावर यशस्वीरित्या पुर्ण केलेली आहेत,त्यात खालील प्रमुख कामाचा समावेश आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | नविन रस्ते रुंदीकरण व रस्त्यांच्या दोन्ही बाजूने नालीचे बांधकाम (रोड वाइन्डींग) ८२.९७ कि.मी. रस्ते | रु. ४००.०० कोटी |
| २ | शहरातील नालीचे व प्रमूख मोठया नाल्याचे बांधकाम (एस.डब्ल्यू. ड्रेन.) १७९.४५ कि.मी. | रु. ४८.०० कोटी |
| ३ | पाणी पुरवठा पाइप लाईन टाकणे ३५०.०० कि.मी.,<br>पाणी शुध्दीकरण प्रकल्पाचे बांधकाम ( डब्ल्यु.टि.पी. ) २ प्रकल्प,<br>जलकुंभाचे बांधकाम (ई.एस.आर.) २१ जलकुंभ. | रु .२००.०० कोटी |
| ४ | मलनिस्सारण पाईप लाईन टाकणे (स्व्हिरेज पाईप लाईन टाकणे), २१०.०० कि.मी.<br>मलनिस्सारण शुंध्दीकरण प्रकल्पाचे बांधकाम ( एस.टि.पी.) ३ प्रकल्प | रु. २७७.०० कोटी |
| ५ | बिएसयुपी योजने अंतर्गत घराचे बांधकाम १७००० घरकुलाचे बांधकाम<br>व नागरी मुलभूत सुविधाची कामे | रु. ७९४.०० कोटी |
| ६ | गोदावरी नदीवर व रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी २उडडूण पुलाचे बांधकाम<br>( फलॉय ओव्हर ब्रिजचे बांधकाम) | रु. ८८.०० कोटी |
| ७ | गोदावरी तीरावरील घाटाचे बांधकाम व सुशोभिकरण | रु. ६०.०० कोटी |

नांदेड वाघाळा शहर महनगरपालिकेने आपल्यास्तरावर वरील कामे यशस्वीपणे व विहित कालावधीत पुर्ण केल्याबध्दल केंद्र शासनाने ,राज्य शाससनाने व इतर सामाजिक व जागतीक स्तरावरील संस्थांनी पुरस्कार देवून नादेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा गौरव केलेला आहे. राज्यातील इतर ड वर्ग महानगरपालिकांना अशा प्रकारची कामे करण्याचा अनुभव नाही म्हणून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची तुलना राज्यातील इतर ड वर्ग महानरपालिकेशी होवू शकत नाही. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेकडे वरील नमूद योजनेची काम करीत असतांना तांत्रिक अधिकारी/अभियंता व कर्मचारी पुरेसे असून त्यांना अनुभवपण आहे तसेच पाणी पुरवठा व मलनिस्सारण वितरण व्यवस्थेची संपुर्ण माहिती व अनुभव फक्त महानगरपालिका अभियंता यांना असल्यामूळे व भविष्यात या योजनेची देखभाल व दुरुस्तीची कामे ही महानगरपालिकेतील अभियंत्यांनाच करावी लागणार आहे. त्यामूळे पुनरुज्जीवन आणि शहरी परिवर्तन अटलबिहारी अभियान (अमृत) अंतर्गत प्रकल्पाची अमलबजावणी व ती कार्यान्वीत करण्याची सर्व कामे नांदेड वाघाळा शहर महानगपालिके मार्फत केल्यास तांत्रिक दृष्टया सुलभ होईल, तसेच अमृत योजनेतील प्रस्तावित कामे जेएनएनयुआरएमच्या कामाचा पुढील टप्पा असून जेएनएनयुआरएम ची कामे ही नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेतर्फे झालेली आहेत म्हणून वरील सर्व बाबी विचारात घेता, पुनरुज्जीवन आणि शहरी परिवर्तन अटलबिहारी अभियान (अमृत) अंतर्गत करावयाची प्रकल्पातील सर्व कामे शासनाच्या इतर विभागामार्फत न करता या प्रकल्पातील सर्व कामे जेएनएनयुआरएम व बिएसयुपी ,नगरोत्थान योजने प्रमाणेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमार्फत अमलबजावणी व कार्यान्वीत करण्याची मान्यता व्हावी अशी विनंतीही नांदेड वाघाळा शहर महागनपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते महाराष्ट्र शासनास करते.

**विषय क्रं. १२** **प्रस्ताव**

नावाशमनपा हद्दीतील जुना नांदेड भागातील इतवारा, बर्की चौक, मनियार गल्ली, जुना गंज, सराफा, होळी, बागवान गल्ली, किल्ला रोड, रंगार गल्ली, नरसिंह गल्ली, कलाल गल्ली, पाठक गल्ली, नावघाट, करबला रोड, सय्यदान, आदी भागात मागील एक-दोन वर्षापासुन होणारा पाणी पुरवठा दिवसातुन एक वेळेस व ब-याचदा एक–दोन दिवसाआड होत असतांना देखील इ.स. २०१५-१६ मधील मागणी बिलात पाणीपट्टीची रक्कम जादा लावण्यात येऊन त्यावर शास्ती देखील आकारण्यात येत आहे त्यामुळे मागील दोन तीन वर्षात नियमीत व सुरळीत पाणी पुरवठा झाला नसतांनाही मागणी बिलावर जी शास्तीची रक्कम लावण्यात येत आहे ती रक्कम नियमाप्रमाणे माफ करण्यास ही सर्व साधारण सभा मंजुरी देत असुन हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक**:- सौ. सुदर्शना महेश (बाळु) खोमणे **अनुमोदक**:- बालाजी कल्याणकर, दिपकसिंह रावत

**महापौर** आजच्या सभेत ठराव क्र.१०५ अन्वये जे मालमत्ताधारक १० फेब्रूवारी २०१६ पुर्वी मागील मालमत्ता कर व पाणी पटी कराची थकबाकी भरतील त्याना ५० टक्के शास्तीत सुट देण्यास व तसेच सन २०१५-२०१६ चालू आर्थिक वर्षाचा या संपूर्ण मालमत्ता कराचा व पाणी पटी कराचा भरणा करतील त्यांना १०० टक्के मालमत्ता कराची पाणी पटी कराची शास्ती माफ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे पुन्हा शास्ती माफीचा वेगळा निर्णय घेणे चा प्रश्न उदभवत नाही.

**ठराव क्र.११७** **ठराव**

आजच्या सभेत ठराव क्र.१०५ अन्वये जे मालमत्ताधारक १० फेब्रूवारी २०१६ पुर्वी मागील मालमत्ता कर व पाणी पटी कराची थकबाकी भरतील त्याना ५० टक्के शास्तीत सुट देण्यास व तसेच सन २०१५.२०१६ चालू आर्थिक वर्षाचा या संपूर्ण मालमत्ता कराचा व पाणी पटी कराचा भरणा करतील त्यांना १०० टक्के मालमत्ता कराची पाणी पटी कराची शास्ती माफ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असल्यामूळे उपरोक्त प्रस्तावानुसार शास्ती माफीचे प्रस्तावास पुन्हा मान्यता देण्याची आवश्यकता नाही असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्रं. १३** **प्रस्ताव**

मनपा हद्दीतील जेएनएनयुआरएम रस्ता क्रमांक (५-६) इतवारा बाजार, बर्की चौक सराफा ते दरबार मस्जीद पर्यंत व रस्ता क्रं. (८) बर्की चौक मनियार गल्ली ते जुना गंजपर्यंत गुरु-ता-गद्दी सोहळा व रस्ते रुंदीकरणात सदर रस्त्यावरील अनेक मालमत्ता बाधीत झाल्या होत्या. त्या अनुषंगाने सदर रस्त्यावर नविन वास्तु उभारण्यात आल्या आहेत संबंधीत मालमत्ता धारकांना २०१५-१६ मध्ये देण्यात आलेल्या मालमत्ता कर मागणी पत्रामध्ये मोठया प्रमाणावर शास्ती लावण्यात आली असुन जी अन्यायकारक आहे. तरी ज्या संबंधीतांच्या मालमत्ता बाधीत झालेल्या आहेत त्यांना लावण्यात आलेली शास्ती सहानुभुतीपुर्वक विचार करुन मानवतेच्या दृष्टीकोणातुन नियमाप्रमाणे रद्द करण्यात यावी.

**सुचक**:- सौ. सुदर्शना महेश (बाळु) खोमणे **अनुमोदक**:- बालाजी कल्याणकर, दिपकसिंह रावत

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

रस्ता रुंदीकरणाने बाधित झालेल्या भागाची डागडुजी वा पाडलेले भागाचे पूर्नबांधकामास अनाधिकृत बांधकाम शास्ती लावण्यात आलेली नाही परंतू नविन इमारत बांधकाम परवानगी शिवाय असतील वा परवानगी विरुध्द असतील तर त्यांना अनाधिकृत बांधकाम शास्ती लावण्यात आली आहे व ती नियमानुसार आहे.

याबाबत मालमत्तानिहाय वा प्रकरण परत्वे पाहणी करुन निर्णय होवू शकेल त्याकरीता त्या त्या संबंधित मालमत्ताधारकाने अर्ज देवून सोबत पुरावे वा परवानगी जोडली तर नियमानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील २६७ अ नुसार अनाधिकृत बांधकाम शास्ती विषयी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.११८** **ठराव**

मनपा हद्दीतील जेएनएनयुआरएम रस्ता क्रमांक (५-६) इतवारा बाजार, बर्की चौक सराफा ते दरबार मस्जीद पर्यंत व रस्ता क्रं. (८) बर्की चौक मनियार गल्ली ते जुना गंजपर्यंत गुरु-ता-गद्दी सोहळा व रस्ते रुंदीकरणात सदर रस्त्यावरील अनेक मालमत्ता बाधीत झाल्या होत्या. त्या अनुषंगाने सदर रस्त्यावर नविन वास्तु उभारण्यात आल्या आहेत संबंधीत मालमत्ता धारकांना २०१५-१६ मध्ये देण्यात आलेल्या मालमत्ता कर मागणी पत्रामध्ये मोठया प्रमाणावर शास्ती लावण्यात आली असुन जी अन्यायकारक आहे. तरी ज्या संबंधीतांच्या मालमत्ता बाधीत झालेल्या आहेत त्यांना लावण्यात आलेली शास्ती सहानुभुतीपुर्वक विचार करुन मानवतेच्या दृष्टीकोणातुन नियमाप्रमाणे रद्द करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो, नियमानुसार आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.१४** **प्रस्ताव**

मनपा हद्दीतील जुना नांदेड भागातील इतवारा, बर्की चौक, मनियार गल्ली, जुना गंज, सराफा होळी, बागवान गल्ली, किल्ला रोड, रंगार गल्ली, नरसिंह गल्ली, कलाल गल्ली, पाठक गल्ली, नावघाट, करबला रोड, सय्यदान आदी भाग हा मुळ स्वरुपी महसुली गावठाण भाग असल्यामुळे या भागातील मालमत्ता धारकास आकृषिक कर हा सन २०१५-१६ च्या मागणी बिलामध्ये लावण्यात येत आहे त्यामुळे संबंधीत भागास जिल्हाधिकारी कार्यालय व मनपा कार्यालय यांच्यामार्फत दुहेरी बोजा पडत असल्यामुळे याचा नियमानुसार पुर्नविचार करुन सदरील आकृषिक कर या भागातील मालमत्तांना लावण्यात येऊ नये सदरील ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक**:- सौ. सुदर्शना महेश (बाळु) खोमणे **अनुमोदक**:- बालाजी कल्याणकर, दिपकसिंह रावत

**प्रशासकीय टिप्पणी**

महाराष्ट्र शासन निर्णय क्रं. एनएपी-१००६/ प्र.क्रं.२७०/ ल-५ दिनांक ०५ फेब्रुवारी २००९ अन्वये सर्व महानगरपालिका हददीतील अकृषिक कर वसुली त्या त्या महानगरपालिकाकडे सोपविली असुन त्याकरीता महानगरपालिकेस ५ टक्के कर वटाव मिळत आहे, त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेकडे अकृषिक कर वसुली सोपविण्यात आली आहे .

मा. जिल्हाधिकारी व तहसिल कार्यालयाने महानगरपालिकेस सन २००९.१० मध्ये अकृषिक कर मागणी सोपविली होती तेंव्हा त्या कार्यालयाच्या यादया व मागणी रक्कम महानगरपालिकेस देण्यात आली होती त्या यादीतील व महानगरपालिका मालमता कर मागणी रजिष्टरला असलेल्या नांवाची नोंदी जुळत नसल्याने सर्व मालमताना अकृषिक कर मागणी होउ शकली नाही . त्यानंतर उपविभागीय अधिकारी नांदेड व उपआयुक्त महसुल यांनी तहसिल व महानगरपालिका वसुली कर्मचारी यांची संयुक्त बैठक घेउन महानगरपालिका हददीतील मालमताधारकांची अदयायावत यादीनुसार सन २०१३.१४ पासुन सर्व मालमताच्या भुखंड क्षेत्रफळ व वापराआधारे अकृषिक कर आकारणी निश्चीत करुन महानगरपालिकेस वसुलीकरीता सोपविली आहे व त्यानुसार मालमता कराच्या मागणी सह अकृषिक कर मागणी व वसुली करण्यात येत आहे.

तहसिल कार्यालयाने अकृषिक कर मागणी निश्चीत करुन दिलेल्या सर्व मालमतांना अकृषिक कर मागणी करण्यात येत आहे ज्या मालमता गावठाणातील आहेत त्यांच्या कराची मागणी कमी करणे वा रदद करणे हे तहसिल कार्यालयाने करणे आवश्यक आहे त्यांनी तसे दुरुस्ती करुन दिली तर मागणी बददल योग्य ती सुधारणा करण्यात येईल.

**महापौर** अकृषिक कर हा शासनाचा कर असल्यामूळे तो माफ करणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात येते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.११९** **ठराव**

मनपा हद्दीतील जुना नांदेड भागातील इतवारा, बर्की चौक, मनियार गल्ली, जुना गंज, सराफा होळी, बागवान गल्ली, किल्ला रोड, रंगार गल्ली, नरसिंह गल्ली, कलाल गल्ली, पाठक गल्ली, नावघाट, करबला रोड, सय्यदान आदी भाग हा मुळ स्वरुपी महसुली गावठाण भाग असल्यामुळे या भागातील मालमत्ता धारकास आकृषिक कर हा सन २०१५-१६ च्या मागणी बिलामध्ये लावण्यात येत आहे त्यामुळे संबंधीत भागास जिल्हाधिकारी कार्यालय व मनपा कार्यालय यांच्यामार्फत दुहेरी बोजा पडत असल्यामुळे याचा नियमानुसार पुर्नविचार करुन जुना नांदेड भागातील इतवारा, बर्की चौक, मनियार गल्ली, जुना गंज, सराफा होळी, बागवान गल्ली, किल्ला रोड, रंगार गल्ली, नरसिंह गल्ली, कलाल गल्ली, पाठक गल्ली, नावघाट, करबला रोड, सयदान या भागातील मालमत्ताधारकांना अकृषिक कर माफ करण्याची शिफारस ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते महाराष्ट्र शासनास करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. १५** **प्रस्ताव**

मनपा हद्दीतील प्रभाग क्रं. ३६ (अ) अंतर्गत रमामाता आंबेडकर चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या शहरी वसाहतीतुन जाणा-या अवजड वाहतुकीस बंदी घालने करीता या ठरावास सर्वानुमते मान्यता देवुन या भागातील उवजड वाहतुकीमुळे नागरीकांना होणारा त्रास कमी करण्यास नागरीकांच्या सोयी सुविधा विकास कामात प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणे.

**सुचक**:- सौ. वैजयंती भिमराव गायकवाड **अनुमोदक**:- रजीया बेगम अय्युब खान

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव संबंधित विभागास पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१२०** **ठराव**

मनपा हद्दीतील प्रभाग क्रं. ३६ (अ) अंतर्गत रमामाता आंबेडकर चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या शहरी वसाहतीतुन जाणा-या अवजड वाहतुकीमूळे नागरीकांचा त्रास होत असून या रस्त्यावर अपघात होत असल्यामूळे सदर रस्त्यावर जड वाहनास बंदी घालण्यासाठीचा प्रस्ताव संबंधित विभागास सादर करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**विषय क्रं. १६** **प्रस्ताव**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंतीचे हे वर्ष असुन ही जयंती राज्य सरकार मोठया प्रमाणावर साजरी करीत आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य दिव्य पुतळा रेल्वे स्टेशनसमोर उभारण्यात आला असून त्याच पुतळयाचे अद्ययावत सौंदर्यीकरणाही करण्यात आले आहे. सदरील पुतळयास अभिवादन करण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने दिनांक १४ एप्रिल २०१६ च्या पुर्वी अद्ययावचत लिफ्ट बसविण्यात यावी असे ही सर्वसाधारण सभा मंजुर करीत आहे.

**सुचक**:- सौ. अंजली सुरेश गायकवाड **अनुमोदक**:- श्री बाळासाहेब गंगाधरराव देशमुख

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१२१** **ठराव**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंतीचे हे वर्ष असुन ही जयंती राज्य सरकार मोठया प्रमाणावर साजरी करीत आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य दिव्य पुतळा रेल्वे स्टेशनसमोर उभारण्यात आला असून त्याच पुतळयाचे अद्ययावत सौंदर्यीकरणाही करण्यात आले आहे. सदरील पुतळयास अभिवादन करण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने दिनांक १४ एप्रिल २०१६ च्या पुर्वी अद्ययावचत लिफ्ट बसविण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**विषय क्रं. १७** **प्रस्ताव**

नावाशमनपाकेच्या मालकीची सर्व्हे नं. ७२/बी मध्ये मोकळी जागा आहे सदरील सर्व्हे नंबर मध्ये अशिर्वादनगर, या नावाने दलीत बौध्द वसती बसलेली आहे आजुबाजुस जयभिमनगर, जनता कॉलनी, आंबेडकर नगर, लालवाडी, श्रावस्तीनगर, न्यु श्रावस्तीनगर, भिमसंदेश कॉलनी, शिल्पकार नगर, सावित्रीबाई फुले नगर, सुभेदार आंबेडकरनगर, क्रंातीनगर, बुध्द भुमि परिसर अशा बौध्द वस्त्यांमधून अंदाजे ५०००० बौध्द नागरीक वास्तव्य करुन आहेत.

सदरील बौध्द रहिवासी नागरीकांना त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक, साहित्य सांस्कृतिक दृष्टीने महानगरपालिकेच्या वतीने किंवा राज्य शासनाच्या मार्फत अद्यापपावेतो सुविधा प्राप्त करुन दिल्या गेली नाही.

यंदाचे वर्ष हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतकोतरी रौप्य महोत्सवी जयंती वर्ष असून या वर्षामध्ये हा जयंती सोहळा मोठया आनंदाने राज्य व देश साजरा करीत आहे त्या निमित्ताने नांदेड शहरातही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक राष्ट्रीय कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने पिवळी गिरणी सर्व्हे नं. ७२/बी मधील मोकळया जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती सांस्कृतिक भवन भव्य प्रमाणात उभारण्यात यावे. सदरील भवनातील एक मजला व्याख्यामाला, सांस्कृतिक भवन भव्य प्रमाणात उभारण्यात यावे सदरील भवनातील एक मजला व्याख्यानमाला, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी व दुस-या मजल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील दुर्मिळ फोटो आणि इतर प्रेरणादायी वस्तुंचे संग्रहालय, अभ्यासिका, वाचनालय आदिंचा समावेश असलेली एक भव्य वास्तु निर्माण करण्यात यावी असे ही सर्वसाधारण सभा ठराव पारीत करीत आहे.

सदरील नियोजीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती सांस्कृतिक सभागृहाच्या आराखडयास आर्थीक मदत राज्याच्या समाजकल्याण खात्याने विशेष अनुदान म्हणुन मंजुर करावे अशी शिफारस ही सर्व साधारण सभा शासनास करीत आहे.

**सुचक**:- सौ. अंजली सुरेश गायकवाड **अनुमोदक**:- बाळासाहेब गंगाधरराव देशमुख

**महापौर** प्रस्तावानुसार म.प्रा.व नगररचना अधिनियमातील तरतुदीच्या अधिन राहून करण्यास नियोजीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती सांस्कृतिक सभागृहाच्या आराखडयास व बांधकामासाठी विशेष बाब म्हणून आर्थीक मदत देण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या समाजकल्याण विभागास विनंती करण्यात यावी.

**ठराव क्र.१२२** **ठराव**

नावाशमनपाकेच्या मालकीची सर्व्हे नं. ७२/बी मध्ये मोकळी जागा आहे सदरील सर्व्हे नंबर मध्ये अशिर्वादनगर, या नावाने दलीत बौध्द वस्ती बसलेली आहे आजुबाजुस जयभिमनगर, जनता कॉलनी, आंबेडकर नगर, लालवाडी, श्रावस्तीनगर, न्यु श्रावस्तीनगर, भिमसंदेश कॉलनी, शिल्पकार नगर, सावित्रीबाई फुले नगर, सुभेदार आंबेडकरनगर, क्रांतीनगर, बुध्द भुमि परिसर अशा बौध्द वस्त्यांमधून अंदाजे ५०००० बौध्द नागरीक वास्तव्य करुन आहेत.

सदरील बौध्द रहिवासी नागरीकांना त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक, साहित्य सांस्कृतिक दृष्टीने महानगरपालिकेच्या वतीने किंवा राज्य शासनाच्या मार्फत अद्यापपावेतो सुविधा प्राप्त करुन दिल्या गेल्या नाहीत.

यंदाचे वर्ष हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शतकोतरी रौप्य महोत्सवी जयंती वर्ष म्हणून साजरे असून या वर्षामध्ये हा जयंती सोहळा मोठया आनंदाने राज्य व देश साजरा करीत आहे त्या निमित्ताने नांदेड शहरातही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक राष्ट्रीय कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने पिवळी गिरणी सर्व्हे नं. ७२/बी मधील मोकळया जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती सांस्कृतिक भवन भव्य प्रमाणात उभारण्यात यावे. सदरील भवनातील एक मजला व्याख्यामाला, सांस्कृतिक भवन भव्य प्रमाणात उभारण्यात यावे सदरील भवनातील एक मजला व्याख्यानमाला, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी व दुस-या मजल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील दुर्मिळ फोटो आणि इतर प्रेरणादायी वस्तुंचे संग्रहालय, अभ्यासिका, वाचनालय आदिंचा समावेश असलेली एक भव्य वास्तुचे बांधकाम नगररचना अधिनियमातील तरतुदीच्या अधिन राहून करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते तत्वतः मान्यता देते, तसेच सदरील नियोजीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती सांस्कृतिक सभागृहाच्या आराखडयानुसार वास्तुचे बांधकाम करण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस विशेष बाब म्हणून आर्थीक

सहाय्य मंजुर करण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या समाजकल्याण विभागास ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते विनंती करते, व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. १८** **प्रस्ताव**

नांदेड जिल्हा ज्येष्ठ नागरीक संघटनेकरिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके तर्फे ज्येष्ठ नागरिक भवन बांधून देण्यात आलेले असुन त्यास बराच कालावधी लोटलेला आहे परंतु सदरील ज्येष्ठ नागरिक भवन अद्यापही नांदेड जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघटनेला हस्तांतरण करण्यात आलेले नसल्यामुळे सदरील ज्येष्ठ नागरिक भवन त्वरीत ज्येष्ठ नागरिक संघटनेस हस्तांतरीत करुन देण्याबाबत चर्चा करुन निर्णयास्तव.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक**:- संजय मोरे

**महापौर** प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र.१२३** **ठराव**

नांदेड जिल्हा ज्येष्ठ नागरीक संघटनेस ज्येष्ठ नागरिक भवन हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असेही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्रं. १९** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत बि.एस.यु.पी. अंतर्गत तरोडा ब्रम्हपुरी भागासह घरकुलाचे व इन्फ्राचे कामे अदयापपर्यंत किती झाले तसेच इन्फ्रासाठी दोन्ही भागात किती निधी शिल्लक आहे, यासंदर्भात सभागृहात माहीती देउन चर्चा करून निर्णय घेणे बाबत.

**सुचक** :- दिपकसिंह काशिनाथसिंह रावत **अनुमोदक** :- विनय गुर्रम ,प्रमोद (बंडू) खेडकर.

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

केंद्र शासन पुरस्कृत बिएसयुपी योजने अंतर्गत तरोडा (बु व खु) येथील कामास DPR-10 अन्वये दिनांक:25.11.2009 रोजी केंद्र शासनाकडुन मान्यता प्राप्त झाली. या कामाची निविदा किंमत रु.113.54 कोटी असुन जास्तीच्या देकारनुसार रु.123.75 कोटी आहे. या कामासाठी दिनांक:16.08.2010 रोजी मे. पंधे इन्फ्राकॉन्स, प्रा. लि. सोलापूर कंत्राटदार यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले त्याचा तपशील खालील प्रमाणे.

**मंजुर घरकुले** 2100
**रेखाकंन दिलेले घरकुले** 1850
**काम पूर्ण घरकुले** 1539
**प्रगतीत असलेले घरकुले** 311

**<u>कंत्राटदार निहाय केलेल्या घरकुलाचा तपशील:</u>**

| अनु क्र | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटदारास वाटप केलेल्या घरकुलांची संख्या | रेखाकंन दिलेल्या घरकुलांची संख्या | पूर्ण झालेल्या घरकुलांची संख्या | प्रगतीत असलेल्या घरकुलांचा तपशिल | | | | एकुण प्रगतीत (6+7+8+9) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | टप्पा 1 | टप्पा 2 | टप्पा 3 | टप्पा 4 | |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** |
| 1 | पंधे इन्फ्रा प्रा.लि. | 1148 | 1148 | 1144 | 0 | 0 | 2 | 2 | 4 |
| 2 | एन.एस. शेट्टी | 50 | 50 | 50 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | नवकॉन | 48 | 48 | 48 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | एस.कुमार | 75 | 15 | 15 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | साई कं. | 25 | 8 | 8 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | विश्वकर्मा कं. | 96 | 96 | 96 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | स्वान इं | 50 | 5 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | बिल्डवेल | 50 | 50 | 39 | 5 | 0 | 6 | 0 | 11 |
| 10 | बि.जी. भास्करे | 48 | 48 | 0 | 0 | 24 | 24 | 0 | 48 |
| | स्पार्क | 48 | 48 | 0 | 0 | 40 | 8 | 0 | 48 |
| | स्वान | 36 | 36 | 0 | 24 | 12 | 0 | 0 | 36 |
| | पृथ्वी | 48 | 48 | 0 | 0 | 48 | 0 | 0 | 48 |
| | कामारीकर | 48 | 48 | 0 | 12 | 36 | 0 | 0 | 48 |
| 11 | स्वता: लाभार्थी | 178 | 178 | 134 | 0 | 3 | 14 | 27 | 44 |
| **एकुण** | | **1948** | **1826+24= 1850** | **1539** | **41** | **163** | **54** | **29** | **287+24 = 311** |

<u>घरकुले व मुलभूत सुविधांच्या अर्थिक तपशील:</u>

| अनु क्र. | विवरण | निविदा प्रमाणे प्रस्तावित लांबी (मीटर मध्ये) | प्रत्यक्ष क्षेत्रावर झालेले काम (मीटर मध्ये) | शिल्लक काम (मीटर मध्ये) | कामावर तरतुद/ झालेला खर्च (कोटी) | उर्वरित कामाचीकिंमत (कोटी) | झालेल्या कामाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 7 | 8 | 6 |
| 1 | घरकुले | 2100/1826रेखांकने | 1539 | 311 | 64.54/ 42.61 | 21.93 | 66.02% |
| 2 | पाणी पुरवठा वाहीनी | 41733 | 31776 | 9957 | 8.00/ 7.00 | 1.95 | 81% |
| 3 | मलनिस्सारण वाहीनी | 34063 | 25949 | 8114 | 5.95/ 6.44 | -0.49 | 108% |
| 4 | स्टॉर्म वॉटर ड्रेन | 49403 | 43215 | 6188 | 11.55/ 9.81 | 1.73 | 85% |
| 5 | सिमेंट रस्ता | 31000 | 21986 | 9014 | 25.82/ 16.64 | 9.18 | 64.44% |
| 6 | स्ट्रिट लाईट | 135 | 78 | 57 | 0.44/ 1.04 | -0.6 | 235% |
| | | | | **एकुण** | **116.3/ 83.54** | **33.7** | |

घरकुले व मुलभूत सुविधा पूरविणे या कामावर आतापर्यंत 83.54 कोटी एवढा खर्च झाला असुन रु.33.70 कोटी एवढया रक्कमेची कामे प्रगतीत आहेत. यामध्ये फक्त 1850 घरकुलांची कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

केंद्रीय मंजुरी व सहनियंत्रण समिती (CS & MC) यांच्या दि.20.03.2012 रोजीच्या बैठकीतील प्रकल्प मंजुरीच्या निर्देशानुसार घरकुले व मुलभूत सुविधा यांचे खर्चाचे प्रमाण 60:40 असावे असे निर्देश आहेत. त्यानुसार 1850 घरकुले पूर्ण करण्यासाठी रु.52.17 कोटी खर्च अपेक्षित असुन आतापर्यंत रु.42.61 कोटी खर्च झालेला आहे. तसेच मुलभूत सुविधावर 1850 घरकुलासाठी प्रोराटा प्रमाणे रु.43.16 कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. आता पर्यंत मुलभूत सुविधांवर रु.40.93 कोटी एवढा खर्च झालेला असुन रु.2.23 कोटी शिल्लक असलेला निधी पुनर्वसन साईट गौतमनगर व तरोडा भागात लागणार आहे.

**प्रकल्पाच्या विलंबाची कारणे पुढील प्रमाणे आहेत.**

1. लाभार्थ्यांकडुन घरकुल बांधकामासाठीचे कागदपत्रे मुदतीत उपलब्ध झाले नाहीत.
2. कंत्राटदाराकडुन घरकुलांची कामे प्रलंबित होत असल्याने दुसरे लाभार्थ्यांनी कच्च्या घराचे बांधकाम काढण्यास विलंब केला.
3. तरोडा (बु व खु) हा भाग काळया मातीचा असल्याने पावसाळ्याच्या दिवसात नविन रेखांकन देणेस उशीर झाला.
4. प्रकल्प वसाहतीमधील अरुंद रस्त्यामुळे बांधकाम साहित्य नेण्यास काही अंशी अडचणी उद्भवल्या.
5. कंत्राटदाराची कामाची गती लाभार्थ्यांनी कच्चे घर खाली करण्यास विलंब लागत असल्याने गतीवर परीणाम झाला आहे.
6. गौतमनगर (सांगवी) भागात जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन माहे मार्च 2015 मध्ये उशीराने हस्तांतर झाल्यामुळे व पुढील प्रक्रीया करण्यासाठी विलंब झाला आहे.

सदरील प्रकल्पातील प्रगतीत असलेले कामे येत्या सहा महिन्या मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

**महापौर** प्रस्तावाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या माहितीची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र.१२४** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत बि.एस.यु.पी.अंतर्गत तरोडा ब्रम्हपुरी भागासह घरकुलाचे व इन्फ्राचे कामे अदयापपर्यंत किती झाले तसेच इन्फ्रासाठी दोन्ही भागात किती निधी शिल्लक आहे, यासंदर्भात सभाग्रहात माहीती देण्यात आली त्यांची नोंद हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**विषय क्रं. २०** **प्रस्ताव**

जिल्हा नियोजन समितीतर्फे विशेष नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत लहान मुलांसाठी Adventure park विकसीत करणे करीता मंजुरीसाठी जिल्हा नियोजन समितीकडे शिफारस करणे बाबत

**सुचक** :- आनंद चव्हाण **अनुमोदक:**- शफी अहेमद कुरेशी

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १२५** **ठराव**

जिल्हा नियोजन समितीतर्फे विशेष नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत लहान मुलांसाठी Adventure park विकसीत करणे करीता लागणारा निधी मंजुर करण्यासाठी ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते नांदेड जिल्हा नियोजन व विकास समितीकडे याचेकडे शिफारस करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

<u>विशेष बाब म्हणून आयत्या वेळी घेण्यात आलेला तातडीचा विषय .</u>

**विषय क्र.१३** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीत जगज्योती महात्मा बसवेश्वरांचा पुतळा उभारण्याकरीता लागणारी जागा संपादन करण्यासाठी मान्यता देणे बाबत.

**सुचक:**- विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक :**- संजय मोरे

**महापौर** सभेच्या सुरवातीस झालेल्या चर्चे प्रमाणे नांदेड शहरात महात्मा बसवेश्वराचा पुतळा उभारण्यासाठी शासन निर्णय दि.२ फेब्रूवारी २००५ मधील मार्गदर्शक तत्वाची पुर्तता करुन पुतळा उभारण्याची नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार आयुक्त यांना देण्यात येतो.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १२६** **ठराव**

दहाव्या शतकातील जगज्योती महात्मा बसवेश्वर हे खुप मोठे सामाजिक क्रांतीकारी चळवळीचे राजे होवून गेलेले असून त्यांचे नांदेड शहरात व जिल्हयात मोठया प्रमाणात अनुयायी असल्यामूळे ते गेल्या अनेक वर्षापासुन नांदेड शहरात जगत ज्योती महात्मा बसवेश्वरांचा पुतळा उभारण्याची मागणी करीत असल्यामुळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने नांदेड शहरात जगत ज्योती महात्मा बसवेश्वरांचा पुतळा बसविण्यासाठी यापुर्वीच तत्वता मान्यता दिलेली आहे, करीता जगतज्योती महात्मा बसवेश्वरांचा पुतळा उभारण्यास लागणारी जागा संपादीत करण्यासाठी व पुतळा उभारण्यासाठी लागणा-या सर्व प्रकारच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्व साधारण सभा सर्वानुमते देते. तसेच नियोजित पुतळा बसविण्यासाठी लागणारी खाजगी जागा व पुतळा परिसरातील जागेचे सुशोभिकरण करण्यासाठी लागणारी शासकीय जागा ही संबंधित जागा मालकाशी व शासनाशी वाटाघाटी करुन जागा संपादीत करण्यासाठीचे, व राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती यांचा पुतळा उभारण्यास परवानगी देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे शासन निर्णय क्र.स्मारक-३१०२/८८४/प्र.क्र.१२२/२००२/२९ दि.२ फेब्रूवारी २००५ मधील मार्गदर्शक तत्वाची पुर्तता करुन शासना कडून सदर पुतळा उभारणीची मान्यता प्राप्त करुन पुतळा उभारण्याची नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार आयुक्त यांना ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्व साधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**महापौर** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे आजची सभा संपल्याचे जहिर करण्यात येते.
शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव,** | **महापौर,** |
| नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | .नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. |